## केंद्र सरकारकडून रेल्वे कर्मचाऱ्यांना बोनस मंजूर



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने भारतीय रेल्वेच्या कर्मचाऱ्यांसाठी एक मोठा निर्णय घेतला. २०२५-२६ या आर्थिक वर्षातील उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन सरकारने केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ११ लाख ४० हजार ७७० पात्र रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा प्रॉडक्टिव्हिटी लिंक्ड बोनस देण्यास मंजुरी दिली. यासाठी सरकार एकूण २,००९.६१ कोटी रुपयांचा निधी खर्च करणार आहे. सणासुदीच्या दिवसांपूर्वी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा बोनस दरवर्षी दिला जातो. आर्थिक वर्ष २०२५-२६मध्ये भारतीय रेल्वेने देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. दुर्गापूजा, दसरा आणि दिवाळी या सणांच्या अगदी आधी घेतलेल्या या निर्णयामुळे रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.


रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १९ ◆ अंक ८८

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


अंतरंग


अलिबागेत स्पर्धेच्या वादातून राडा; विद्यार्थ्यांना मारहाण/२

कर्जतमधील नागरी प्रश्नांवर आठ दिवसांचा अल्टीमेटम/५

कबड्डी स्पर्धेत भिलजी-बोरघर हायस्कूलचा संघ विजेता/८


# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत

## मुख्यमंत्र्यांची घोषणा; खात्यात पाच हजार रुपये अग्रीम जमा करणार

### आणखी ४० तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश

### विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क सरसकट होणार माफ

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील आणखी ४० तालुके दुष्काळी म्हणून जाहीर करतानाच या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना आगामी दिवाळीच्या तोंडावर दिलासा म्हणून त्यांच्या खात्यावर पाच हजार रुपयांचा अग्रीम जमा करण्याचा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बुधवारी (दि.१४) राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर मुख्यमंत्री माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

शेतकऱ्यांकडून कर्ज वसुलीसाठी कुठल्याही प्रकारचा तगादा लावण्यात येऊ नये, अशी सक्त ताकीद संबंधित सोसायट्यांपासून जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांना दिल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाण्याच्या अवैध उपशावर कठोर कारवाईचे निर्देश दिल्याचे आणि त्यासाठी १६ हजार वीज जोडण्या तोडण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

राज्यात यापूर्वीच २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यामध्ये आता आणखी ४० तालुक्यांचा समावेश करण्यात येत आहे. आता दुष्काळी तालुक्यांची संख्या ३०५ इतकी झाली आहे. या तालुक्यांमध्ये दुष्काळी उपाययोजना करण्यास प्राधान्य



देण्यात येणार आहे. यापूर्वीच्या समाविष्ट तालुक्यांमध्ये दुष्काकाळाबाबत ट्रिगर-१ लागू केला होता. आता नव्याने समाविष्ट तालुक्यांसह या तालुक्यांमध्ये ट्रिगर लागू करण्याबाबतच्या कार्यवाहीला गती देण्यात येत आहे.

दुष्काळी तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क कोणतेही निकष न लावता सरसकट माफ करण्याचे निर्देश देण्यात आल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका प्रश्नावर स्पष्ट केले.

जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत उपाययोजनांची चर्चा करण्यात आली तसेच चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत सर्वंकष आढावा घेण्यात आला. जिथे पाणी आहे, तिथे चाऱ्यांसाठीच्या पिकांची लागवड करण्यात यावी. त्याचप्रमाणे रब्बीमध्येही ज्वारीसारखी चारा देणारी पिके घेण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी सूचना करण्यात आली आहे. जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा यासाठी शेतकऱ्यांकडून लागवड करण्यात आलेल्या चाऱ्याची शासन हमी भावाने खरेदी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यात शेतीसाठी साडेसात अश्वशक्तीपर्यंत वीजपुरवठा मोफतच आहे. यातूनही वीज बिलासाठी कुणी तगादा लावत असेल, तर त्यांना तसे न करण्याबाबत सक्त सूचना देण्यात येतील. कर्ज वसुलीसाठीही शेतकऱ्यांना तगादा लावू नये, असे निर्देश सोसायट्या आणि जिल्हा बँकांना देण्यात आल्या आहेत. मायक्रो फायनान्स कंपन्यांवरही लक्ष ठेवण्यात येत असून त्यांनीही आतातायीपणा करू नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### अंगणवाडी सेविका, मदतनीसांना दिवाळीपूर्वीच मिळणार भाऊबीज

**मुंबई :** राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिवाळीपूर्वीच शासनाकडून भाऊबीज भेट म्हणून प्रत्येकी दोन हजार रुपये देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

राज्यात एक लाख आठ हजार ६२७ अंगणवाडी सेविका आणि एक लाख पाच हजार ४७० अंगणवाडी मदतनीस अशी एकूण दोन लाख १४ हजार ९७ पदे कार्यरत आहेत. या सर्व कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रत्येकी दोन हजार रुपये भाऊबीज भेट देण्यात येणार आहे. यासाठी ४२ कोटी ८१ लाख ९४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील गर्भवती महिला, स्तनदा माता आणि बालकांच्या पोषणाची काळजी घेणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची दिवाळी गोड व्हावी, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे मंत्री तटकरे यांनी सांगितले.

## पंतप्रधान मोदींच्या अभिनंदनाचा ठराव

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७ ऑक्टोबर २००१ ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून सरकारचे प्रमुख या नात्याने सलग २५ वर्षे जनसेवा केली आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा ठराव राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेला अभिनंदनाचा ठराव मंत्रिमंडळाच्या बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्यांनी टाळ्यांच्या गजरात या ठरावाचे स्वागत केले.

## मुरूडमध्ये ड्रग्ज जप्त

### तीन जण ताब्यात

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहराजवळील राजवाडा परिसरातून दोन जणांना चरस व एमडी या अमली पदार्थांसह पोलिसांनी ताब्यात घेतले, तर ज्याच्याकडून त्यांनी हे ड्रग्ज घेतले त्या मुख्य आरोपीलाही अटक करण्यात आली आहे.

मुरूडनजीक असणाऱ्या सर सिद्धी अहमद खान यांच्या राजवाड्याचे लोखंडी तार कंपाऊंड फाकवून दोघांनी आत प्रवेश केला. यापैकी एक अल्पवयीन असून दुसऱ्या आरोपीचे नाव महेश चव्हाण (दोघेही रा. म्हसळा) असे आहे. हे दोघे काळ्या रंगाची स्कॉर्पिओ (एमएच ०६ सीएल २७६५) घेऊन आले होते व नशेत बेधुंद झाले होते. याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे तीन ग्रॅम चरस आणि १,८७० मिलीग्रॅम एमडी आढळले. या ड्रग्जसह स्कॉर्पिओ वाहन आणि मोबाइल फोन पोलिसांनी जप्त केले. या प्रकरणात एकूण १० लाख ४६ हजार ४३५ रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

या प्रकरणात पोलिसांनी दोघांकडे चौकशी केली असता त्यांनी ज्याच्याकडून ड्रग्ज घेतले त्या मुख्य आरोपीलाही नुकतीच अटक करण्यात आली. नुरान चोगले (२१, रा. श्रीवर्धन) असे त्याचे नाव आहे, तर अल्पवयीन मुलाला बालसुधारगृहात पाठविण्यात आले आहे.

## उष्णता वाढणार अन् पाऊसही पडणार!

**मुंबई : प्रतिनिधी**

एल निनोमुळे वातावरणात मोठे बदल होत असल्याचे जाणवत आहेत. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत उन्हाच्या झळाही तीव्र होण्याची चिन्हे आहेत, तर काही जिल्ह्यांत पावसाच्या हलक्या सरी पडण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

राज्यात उष्णतेच्या लाटेचे चटके जाणवण्यास सुरुवात झाली आहे. कोकण किनारपट्टीवरही बुधवारी (दि.१४) उन्हाचा तडाखा जाणवला. १५ ऑक्टोबर रोजीही मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत उष्णतेची लाट असेल, तर कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांत पावसाच्या सरी कोसळतील. तुरळक ठिकाणी कडकडाटासह वादळी वारे आणि हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

यानंतर १६ ऑक्टोबर रोजी मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यांत उष्णतेची लाट, तर पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, सोलापूर या जिल्ह्यांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

१७ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्रातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, लातूर, धाराशिव, नांदेड या जिल्ह्यांत पाऊस पडण्याचा अंदाज आहे. त्याचबरोबर १८ ऑक्टोबर रोजी सिंधुदुर्ग, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, नांदेड, हिंगोली, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया या जिल्ह्यांत कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून यलो अलर्ट दिला गेला आहे.

## निवडक

### नालासोपाऱ्यात इमारतीला आग; दोन महिलांचा मृत्यू

**नालासोपारा :** येथील इम्पिरियल हेरिटेज या १४ मजली इमारतीमध्ये मंगळवारी रात्री लागलेल्या भीषण आगीत दोन महिलांचा धुरामुळे गुदमरून मृत्यू झाला, तर इमारतीत अडकलेल्या २८ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. मृत महिलांची नावे अश्विनी पारकर आणि फाल्गुनी शाह अशी आहेत. या दोघीही इमारतीच्या बाराव्या मजल्यावर राहत होत्या. मीटर रूममध्ये लागलेली आग डक्टमधून वेगाने वरच्या मजल्यांपर्यंत पोहचली. बरेच रहिवासी गरबा खेळण्यासाठी बाहेर गेले असताना ही दुर्घटना घडली.

### सौरभ कटियारांकडे एमपीएससी सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे देण्यात आला आहे. याबाबतचा आदेश सामान्य प्रशासन विभागाने जारी केला आहे. एमपीएससी सचिव महेंद्र हरपाळकर यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी १ ऑक्टोबरपासून प्रशासकीय कारणास्तव संपुष्टात आणण्यात आला, असे आदेशात नमूद आहे.

## पनवेल मनपाचा अतिक्रमणांवर हातोडा

### सहा लाख ४८ हजार रुपयांचा दंड वसूल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेने शहर आणि परिसरात विनापरवाना उभारण्यात आलेले अनधिकृत बॅनर्स, टपऱ्या, स्टॉल, फळविक्रेते, भाजी विक्रेते, नर्सरी आणि रस्त्यांवरील अतिक्रमणांवर तीव्र मोहीम उघडली आहे. गेल्या काही दिवसांपासून पालिकेच्या सर्व प्रभाग समित्यांमध्ये राबवण्यात आलेल्या या संयुक्त कारवाईत विविध ठिकाणची अतिक्रमणे हटवण्यात आली असून सहा लाख ४८ हजार रुपयांचे दंडात्मक शुल्क वसूल करण्यात आले आहे.

वाहतूक कोंडीमुक्त रस्त्यांसाठी ही धडक कारवाई हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पालिकेच्या सर्व प्रभाग अधीक्षकांच्या अतिक्रमणविरोधी संयुक्त पथकांनी शहरातील विविध प्रभागांत फिरून अतिक्रमण करणाऱ्यांवर कडक कारवाई केली. अतिक्रमण केलेल्या दुकानदारांनी आपले अतिक्रमण काढून घेऊन फूटपाथ चालण्यास रिकामे करावेत तसेच फेरीवाल्यांनी अतिक्रमण पथकाशी वाद घालू नये, नागरिकांनी राडारोडा रस्त्यांवर टाकू नये, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी केले आहे.

पनवेल महापालिकेच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात ५ ते १३ ऑक्टोबरदरम्यान ५१३ अनधिकृत बॅनर्स, तीन कमानी, २७ नर्सरी, ३२ टपऱ्या, ५० स्टॉल्स, नऊ टेम्पो, २०५ हातगाड्या आणि १११ अनधिकृत शेड निष्कासित करण्यात आल्या आहेत.

दुकानदारांना पावसाळी शेडसाठी १५ ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती. ही मुदत आता संपुष्टात येत असून दुकानदारांनी शेड काढून घेण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, नागरिकांना वाहतुकीचा त्रास होऊ नये आणि शहराचे सौंदर्य आबाधित राहावे यासाठी अनधिकृतपणे फ्लेक्स, बॅनर्स, टपऱ्या अथवा शेड उभारणाऱ्यांवर यापुढेही पालिका प्रशासनाकडून कडक व दंडात्मक कारवाई सत्र सुरूच राहील, असा स्पष्ट इशारा महापालिकेकडून देण्यात आला आहे.

## खारघरमध्ये श्री कच्छ कडवा पाटीदार समाजाचा नवरात्रोत्सव

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतले देवीचे दर्शन





**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथे श्री कच्छ कडवा पाटीदार समाजाच्या वतीने नवरात्रोत्सव आयोजित करण्यात आला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या नवरात्रोत्सवाला भेट देऊन देवीचे दर्शन घेतले.

यावेळी श्री कच्छ कडवा पाटीदार समाजाचे प्रमुख कांतिभाई पटेल आणि पाटीदार समाज युवक मंडळाचे अध्यक्ष हसमुखभाई पटेल यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे स्वागत करून त्यांचा सन्मान केला.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष तथा नगरसेवक प्रवीण पाटील, नगरसेवक नरेश ठाकूर, शत्रुघ्न काकडे, नगरसेविका परेशा ब्रिजेश पटेल, अनिता वासुदेव पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, युवा मोर्चाचे अध्यक्ष प्रवीण बेरा यांच्यासह युवक मंडळाचे मंत्री सागर पोकार, उपाध्यक्ष संजय पोकार, समाजाचे महामंत्री राजूभाई पोकार, उपाध्यक्ष जीतूभाई रामजियानी, किरीटभाई भावानी, नरसिंहभाई पटे आदी उपस्थित होते.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने समाजातील एकता, संस्कृती आणि धार्मिक परंपरांचे दर्शन घडले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवक मंडळाचे माजी प्रमुख राजेशभाई छाभैया यांनी केले.





**पनवेल :** माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना नुकतेच शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी एम.के. कोंगेरे, पीआरओ बाळासाहेब कारंडे, जे.जे. चिखलेकर, वैभव गावंड, करण म्हात्रे, विनय म्हात्रे, महेश घोडके, अजित भोसले, सोमनाथ पाठे यांनी त्यांचे अभिनंदन केले. मराठी ब्राम्हण समाज खारघरच्या वतीनेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शुभदा अरावकर, अश्विनी देशमुख यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून हत्या करणारा नराधम गजाआड

**नवी मुंबई : वार्ताहर**

अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याप्रकरणी तुर्भे पोलिसांनी आरोपीला मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वेस्थानकावरून अटक केली आहे. विशेष म्हणजे हा नराधम मुलीच्या परिचयाचा असल्याचे तपासात समोर आले आहे.

मयत नऊ वर्षीय मुलगी इयत्ता पाचवीत शिक्षण घेत होती. ती शनिवारी दुपारी खेळण्यासाठी घराबाहेर पडली, मात्र संध्याकाळी घरी न आल्याने बेपत्ता झाल्याची तक्रार तुर्भे पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. पोलिसांनी तपास सुरू करून सीसीटीव्ही चित्रण व गुप्त माहितीच्या आधारे ३० वर्षीय आरोपीचा माग काढला. मुलीला खाऊचे आमिष दाखवून पावणे एमआयडीसीतील बावखळेश्वर मंदिरालगतच्या जंगलात नेत नराधमाने तिच्यावर लैंगिक अत्याचार करून गळा दाबून हत्या केली. या सैतानाला फाशीची शिक्षा देण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

## जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडजवळील राजपुरी ग्रामपंचायत हद्दीत असलेला जंजिरा किल्ला पावसाळ्यानंतर अखेर बुधवारी (दि.१४) खुला करण्यात आला. त्यामुळे पर्यटकांची पावले या किल्ल्याकडे पुन्हा वळू लागली आहेत.

पावसाळ्यात पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पुरातत्त्व विभागाकडून जंजिरा किल्ला बंद ठेवण्यात येतो. यंदा पावसाळा संपला असतानासुद्धा साफसफाईच्या नावाखाली गेले अनेक दिवस या किल्ल्याचे दरवाजे बंदच होते. त्यामुळे देश-विदेशातून किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त होत होती.

याबाबत स्थानिक पत्रकारांनी खासदार सुनील तटकरे यांना अवगत केले असता त्यांनी पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संवर्धक अधिकारी बजरंग येलीकर यांना किल्ला सुरू करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार पुरातत्त्व विभागाने किल्ल्याचे दरवाजे उघडले. पर्यटकांनी हजेरी लावल्याने स्थानिकांना रोजगार प्राप्त झाला आहे.



जंजिरा किल्ला पाहण्यासाठी १५ वर्षांखालील मुला-मुलींना प्रवेश शुल्कातून सूट देण्यात आली आहे, तर १६ वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीसाठी २५ रुपये प्रवेश शुल्क आकारण्यात येणार आहे. पर्यटकांच्या सोयीसाठी ऑनलाइन क्यूआर कोडद्वारे शुल्क भरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी कल्याण कुमार झा आणि प्रितेश जाटव यांनी दिली.

# दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल केल्यास कारवाई -मंत्री चंद्रकांत पाटील

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी कोणत्याही विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेता त्यांचे परीक्षा अर्ज भरून घेण्यात यावेत. ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल करण्यात आले, ते शुल्क त्यांना परत करण्यात यावे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी या निर्देशांचे पालन करावे. विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल केल्याचे आढळल्यास संबंधित महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत.



सह्याद्री अतिथिगृह, येथे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत ऑनलाइन बैठक घेण्यात आली. या बैठकीत दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काचा आढावा घेण्यासह विद्यापीठांच्या परीक्षा प्रक्रिया, पेपरफुटी रोखण्यासाठी उपाययोजना, निकालांमधील सुसूत्रता, शैक्षणिक वेळापत्रक, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि विद्यार्थी निवडणुकांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी प्रधान सचिव रणजित सिंह देओल, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ संचालक तथा तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, उपसचिव अमोल मुत्याल, उपसचिव प्रताप लुबाळ, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, सर्व सार्वजनिक विद्यापीठाचे कुलगुरू (ऑनलाइन) व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये. यामध्ये अभियांत्रिकी महाविद्यालये, कला महाविद्यालये तसेच विभागाच्या अखत्यारीतील अन्य महाविद्यालयांचाही समावेश आहे. विद्यार्थ्यांवर आर्थिक भार पडू नये म्हणून हा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेतले असल्यास ते तातडीने परत करावे, असे निर्देश मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सर्व कुलगुरू आणि संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, पेपरफुटीसारखे गैरप्रकार रोखणे आणि निकाल प्रक्रियेत सुसूत्रता निर्माण करणे आवश्यक असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले. केंद्र सरकारने पेपरफुटी व परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी केलेल्या कायद्यातील तरतुदी महाराष्ट्रात लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

परीक्षेतील गैरप्रकार किंवा पेपरफुटीमध्ये दोषी आढळणाऱ्या व्यक्तींना कठोर शिक्षा होण्याची तरतूद असून संबंधित कायद्यातील तरतुदींनुसार दोषींना १० वर्षांपर्यंत कारावास आणि १० कोटी रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. त्यामुळे विद्यापीठांनी परीक्षा व्यवस्थेत आवश्यक खबरदारी घेऊन गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे निर्देशही मंत्री पाटील यांनी दिले. पुढील शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठांचे निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांना त्यांची पदवी प्रमाणपत्रे डिजिलॉकरमध्ये तातडीने उपलब्ध करून द्यावीत त्यामुळे परदेशात उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया, पुढील शिक्षण आणि इतर आवश्यक कामांसाठी पदवी प्रमाणपत्रे वेळेत उपलब्ध होण्यास मदत होईल आणि प्रमाणपत्रांसाठी वारंवार विद्यापीठांमध्ये जाण्याची गरज लागणार नाही आणि विद्यार्थ्यांचा वेळ आणि श्रम वाचेल.

त्यामुळे तातडीने पदवी प्रमाणपत्रे डिजिलॉकरमध्ये उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

## गर्भवती पत्नीवर हल्ला; पतीला अटक

**पनवेल : वार्ताहर**

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन गर्भवती पत्नीवर धारदार चाकूने वार करत तिच्या डोक्यात गॅस सिलिंडर घालून हत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उलवे सेक्टर १९ मधील बालाजी होम सोसायटीत घडली. याप्रकरणी आरोपी पती निखिल सामंत (२५) याला पोलिसांनी अटक केली आहे. निखिल हा पत्नी भारती सामंत (२४) हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला वारंवार मारहाण करत असल्याची माहिती आहे.

याच कारणावरून दोघांमध्ये वाद झाल्यानंतर त्याने गर्भवती भारतीवर चाकूने वार केले. त्यानंतर तिच्या डोक्यात गॅस सिलिंडर घालून हल्ला केला. यात भारतीच्या मानेवर, गळ्यावर आणि चेहऱ्यावर गंभीर दुखापती झाल्या असून तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी पतीला अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीचे शोषण; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा परिसरात राहणाऱ्या तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तीन वर्षे लैंगिक शोषण केल्याचा आरोप असलेल्या अमित रामप्रवेश राय (३२) याच्याविरुद्ध तुर्भे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने दुसऱ्या तरुणीशी विवाह केल्यानंतर प्रकार उघडकीस आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जुलै २०२२मध्ये पुणे येथे आरोपीची पीडित तरुणीशी मैत्री झाली. त्यानंतर प्रेमसंबंध प्रस्थापित करून लग्नाचे आश्वासन देत जुलै २०२२ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत विविध ठिकाणी वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप पीडितेने केला आहे.

## अलिबागमध्ये क्रीडा स्पर्धेतील वादातून राडा; विद्यार्थ्यांना मारहाण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय, अलिबाग यांच्या वतीने नेहुली क्रीडा संकुल येथे आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेदरम्यान जय-पराजयाच्या कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात बेकायदेशीर जमाव जमवून मारहाण करणे व दुखापत करणे यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांकडे दाखल तक्रारीनुसार क्रीडा स्पर्धेतील वादानंतर काही जणांनी तेजस मोहन म्हात्रे (रा. पेझारी) व त्यांच्यासोबत असलेल्या विद्यार्थ्यांना लक्ष्य केले. या घटनेत विद्यार्थ्यांना मारहाण करण्यात आली. तसेच एका विद्यार्थ्याच्या गळ्यातील सोन्याची चेन पडून तिचे नुकसान झाल्याचा उल्लेखही तक्रारीत आहे. याशिवाय उपस्थित असलेल्या एका व्यक्तीलाही मारहाण करून दुखापत केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या मारहाणीत तेजस म्हात्रे, साहील भगत, हर्ष म्हात्रे, हर्षित पाटील, कुणाल भिंगे हे जखमी झाले असून त्यांच्यावर अलिबाग जिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले.

या प्रकरणात संबंधितांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने निर्माण झालेला वादाने गंभीर स्वरूप धारण केल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी अष्टदा सूर्यकांत भगत, विराज जुईकर यांच्यासह त्यांच्या २० ते २५ सहकाऱ्यांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

तक्रारीत नमूद केलेल्या व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. प्रकरणाचा पुढील तपास अलिबाग पोलीस करीत आहेत.

## पनवेलमधून मुलीसह विवाहिता बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील पारगाव येथून २१ वर्षीय विवाहित महिला आणि तिची तीन वर्षांची मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दोघीही राहत्या खोलीतून कोणालाही काही न सांगता निघून गेल्या. याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून सहायक पोलीस निरीक्षक अजित बिरादार अधिक तपास करत आहेत.



बेपत्ता महिलेचे वय २१ वर्षे, रंग सावळा, उंची सुमारे ५ फूट, शरीराने सडपातळ, नाक सरळ, चेहरा गोल, डोक्याचे केस लांब व काळे. तिच्या पाठीवर काळा तीळ असून बेपत्ता होताना तिने काळ्या रंगाचा पोशाख आणि पायात सॅन्डल घातले होते. बेपत्ता मुलगी शरीराने सडपातळ, डोळे काळे आणि डोक्याचे केस लांब आहेत. या महिला व मुलीबाबत कोणाला माहिती मिळाल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहायक पोलीस निरीक्षक अजित बिरादार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# एमएनएम विद्यालयात आरोग्य जनजागृती कार्यक्रम उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमएनएम विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपर येथे बुधवारी (दि. १४) पी.एस.यू. गव्हाण यांच्या वतीने आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांना विविध आजारांविषयी माहिती देऊन आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात डेंग्यू, मलेरिया, विविध संसर्गजन्य रोग, कुष्ठरोग तसेच एचआयव्ही/एड्स आजारांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. या आजारांचा प्रसार, त्यांची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. डेंग्यू व मलेरियापासून बचाव करण्यासाठी परिसर स्वच्छ ठेवणे, साचलेले पाणी काढून टाकणे, डासांची उत्पत्ती रोखणे आणि वैयक्तिक स्वच्छता राखणे यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. तसेच कुष्ठरोगाविषयी असलेले गैरसमज दूर करणे, एचआयव्ही/एड्सबाबत योग्य माहिती मिळवणे आणि संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेणे यावर विशेष भर देण्यात आला.

कार्यक्रमासाठी आरोग्य सेवक मोहन जगताप व अभिजीत खंडागळे तसेच आशा सेविका सुनीता पाटील व सुगंधा घरत उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक माहिती देऊन रोगप्रतिबंध आणि स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाला विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे तसेच शिक्षक अविनाश कजबजे, नीलम सूर्यवंशी, वंदना जाधव आणि इयत्ता आठवी व नववीचे शिक्षक उपस्थित होते. प्राचार्या सायली वडवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य, स्वच्छता आणि रोगप्रतिबंधाविषयी जागरूकता निर्माण झाली. निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणे आणि समाजात आरोग्यविषयक जनजागृती करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.



# भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जेबीएसपी संस्थेच्या भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी येथे शाश्वत विकासासाठी विज्ञान ही मध्यवर्ती संकल्पना घेऊन शालेयस्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात पार पडले. यात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कल्पक प्रकल्पांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. जेबीएसपी संस्थेच्या भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी येथे शालेयस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.



सायन्स फॉर सस्टेनेबिलिटी ही यावर्षीच्या प्रदर्शनाची मध्यवर्ती थीम होती. या प्रदर्शनाचे उद्घाटन उरण जसखार केंद्र प्रमुख त्रिपाठी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत, शाळा कमिटी सदस्य सुरेश पाटील, सीमा घरत तसेच संस्था शाळा इन्स्पेक्टर संतोष चव्हाण उपस्थित होते. परीक्षक म्हणून रोटरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या निलिमा ठाकूर यांना निमंत्रित करण्यात आले होते. या प्रदर्शनात दोन गटांत एकूण ४१ विज्ञान प्रकल्प सादर करण्यात आले. गट १ मध्ये इयत्ता ६ वी ते ७ वीचे एकूण २६ प्रकल्प, तर गट २ मध्ये इयत्ता ८ वी ते १० वीचे एकूण १५ प्रकल्प होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोना पाटील यांनी केले. शाळेच्या प्राचार्या अनुराधा काठे यांनी सर्वांचे स्वागत केले. केंद्र प्रमुख त्रिपाठी यांनी स्वतः सर्व विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांना भेट देऊन त्यांना मार्गदर्शन केले आणि विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे कौतुक केले. या प्रदर्शनात छोट्या शास्त्रज्ञांनी विविध कल्पक विषय मांडले, ज्यामध्ये इंडिया फ्युचर २०५० – स्मार्ट सिटी, एआय बेस्ड मॅजिकल डिटेक्टर, स्मार्ट एड्युस्लेट, डोंगराळ भागासाठी स्मार्ट वॉटर कॉन्झर्वेशन सोल्यूशन, टेम्परेचर चेंजेस इन सिटी, स्मार्ट हायड्रॉलिक लिफ्ट, स्मार्ट युज ऑफ सोलर एनर्जी या विषयांचा समावेश होता.

## संभाव्य दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी पनवेल पालिका सज्ज

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संभाव्य दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी पनवेल पालिका सज्ज असून आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपाययोजनांची जय्यत तयारी करण्यात आली, अशी माहिती पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेत देण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने व पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या सहकार्याने आयोजित माझी मराठी देवालाही आवडे या संत गीतांच्या कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यासाठी आलेल्या मंचाच्या शिष्टमंडळाशी पनवेल पालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी संभाव्य दुष्काळाच्या विरोधात मोर्चेबांधणीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा केली.



पालिका हद्दीतील अनेक प्रश्नांबाबत यावेळी सकारात्मक चर्चा करण्यात आली. अल निनोमुळे भारतातील सरासरी पर्जन्यमान कमी राहिले. याचाच परिपाक म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला असून अन्य ठिकाणी त्या अनुषंगाने सर्वेक्षण सुरू आहे. पालिका हद्द तसेच तालुका हद्दीतही एकूण पाऊस सरासरी पर्जन्यमानापेक्षा कमी राहिला. त्यामुळे पाण्याच्या दुर्भिक्षाला सामोरे जावे लागेल. या पार्श्वभूमीवर आयुक्त मंगेश चितळे यांनी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार संजय सोनावणे, सल्लागार संजय कदम, सल्लागार मंदार दोंदे व खजिनदार दत्ता कुलकर्णी यांच्या समवेत संवाद साधला.

आयुक्त मंगेश चितळे म्हणाले, यापूर्वीच ८३ विहिरींमधील गाळ काढून साठवणूक क्षमता वाढवण्यात आली. रोज अतिरिक्त २ एमएलडी पाणी मिळवण्याच्या दृष्टिकोनातून आम्ही प्रयत्नशील आहोत. टँकर पॉइंट्सचे सर्वेक्षण झाले असून पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व टँकर्सवर जीपीएस कार्यरत असेल. प्रत्येक टँकरवर अदा करायचे मूल्य लिहिलेले असणार आहे तसेच ते यूपीआयद्वारे थेट खात्यात जमा होण्यासंदर्भातही उपाययोजना करणार आहोत. पाण्याचा अपव्यय होऊ नये यासाठी जनजागृती करण्याबाबतही उपाययोजना सज्ज आहे.

जिथे जिथे पाणीगळती होते, अशा ठिकाणी तातडीने उपाययोजना करत आहोत. संभाव्य पाणीचोरी लक्षात घेता सतर्क राहून आम्ही निर्बंध घालणार आहोत. आयुक्त मंगेश चितळे म्हणाले, पनवेल पालिका ही मुंबई, ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकांनजीक आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत अर्थार्जन करण्यासाठी येणाऱ्या अन्य जिल्ह्यांतील नागरिकांचे प्रमाणही वाढणार आहे. याचा परामर्श घेऊन आम्ही काटेकोरपणे नियोजन केले आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका संभाव्य दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सज्ज झालेली असल्यामुळे पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या शिष्टमंडळाने आयुक्त मंगेश चितळे यांचे अभिनंदन केले तसेच आपत्कालीन परिस्थितीत पनवेल तालुका पत्रकार विकास मंच सदैव प्रशासनासोबत उभा असेल, अशी ग्वाही दिली.



**कोलकाता : येथील पोटचे चेअरमन रवींद्र रमण यांच्यासोबत भारतीय मजूर संघाचे राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश पाटील, कोषाध्यक्ष सुधीर घरत, उद्योग प्रभारी अण्णा धुमाळ, कोलकाता युनियनचे नेते आरोपचंद्र राय, जनरल सेक्रेटरी समीर मुजुमदार यांनी कामगारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली. यावेळी कामगार विश्वस्तपदासाठी गुप्त मतदान घेण्याचे मान्य करण्यात आले.**

# विविध उपक्रमांनी उद्या रंगणार पनवेल मनपा सेवा संकल्पचा सांगता समारोह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या सेवा संकल्प अभियानाचा सांगता समारोह विविध स्पर्धा, बाईक रॅली आणि जनजागृतीपर उपक्रमांनी होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महापौर नितीन पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

या अभियानाचा सांगता समारोह शुक्रवारी (दि. १६) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत होणाऱ्या या कार्यक्रमात विविध स्पर्धा, बक्षीस वितरण, व्याख्याने, जनसेवकांचे अनुभव कथन आणि जनजागृतीपर स्टॉल्सचा समावेश असेल. या सांगता समारोहानिमित्त सकाळी ९ ते १२ या वेळेत नाट्यगृहाच्या दुसऱ्या मजल्यावर नागरिकांसाठी खुली चित्रकला, रांगोळी स्पर्धा आणि खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांसाठी एकूण २४ बक्षिसे देण्यात येणार आहेत. याची आगाऊ नोंदणी जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी (७७१५८१५१२७) यांच्याकडे व्हॉट्सअॅपद्वारे करावी.



खुली चित्रकला, रांगोळी स्पर्धा सकाळी ९ ते १२ या वेळेत होणार असून ठिकाण नाट्यगृहाचा दुसरा मजला आहे. भारतीय राष्ट्रीय प्रतीके (राष्ट्रध्वज, अशोकचक्र, अशोक स्तंभ, कमळ), विकसित भारत २०४७ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्पर्धेचे विषय आहेत. सेवा संकल्प अभियानाची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी सकाळी ११ ते १२ या वेळेत शहरातून बाईक रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीचा समारोप आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे होईल. त्यानंतर सकाळी १२ ते १२.३० या वेळेत डिजिटल साक्षरता आणि सायबर फसवणुकीपासून बचाव या विषयावर सायबर सिक्युअर्ड इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रथमेश रहाणे यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी, ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार आणि त्यापासून बचाव करण्याच्या उपाययोजनांविषयी नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. दुपारी १२.३० ते २.३० या वेळेत जनसेवक महाकुंभ हा विशेष कार्यक्रम होणार आहे. यामध्ये महापालिका सदस्य, सभागृहनेते, महापौर आणि आमदार यांच्यासह लोकप्रतिनिधी आपले अनुभव कथन करणार असून त्यांची मुलाखत घेतली जाणार आहे. नागरिकांशी संवाद साधणे, जनसेवेतील अनुभव मांडणे आणि लोकाभिमुख प्रशासनाच्या कार्यपद्धतीविषयी विचारांची देवाणघेवाण करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. कार्यक्रमात स्वागत समारंभ, विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षीस वितरण, प्रमाणपत्र वितरण आणि विविध मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे.

अभिजात मराठी भाषा, हर घर तिरंगा तसेच सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्यांचाही गौरव केला जाणार आहे. सेवा संकल्प अभियानाच्या सांगता समारोहात नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासोबतच प्लास्टिकमुक्त अभियान तसेच सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन, आरोग्य जागरूकता आणि डिजिटल सुरक्षिततेचा संदेश देण्यावर भर देण्यात येणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहणाऱ्या सर्वांना विशेष भेट देण्यात येणार आहे. सांगता समारोहाच्या ठिकाणी नागरिकांसाठी विविध विषयांवरील माहितीपर स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. यामध्ये महिला आरोग्य, रक्तदान आणि अवयवदान संकल्प अभियान यांची माहिती देणारा वैद्यकीय आरोग्य विभागाचा स्टॉल असेल.

स्वच्छता ही सेवा संकल्पनेंतर्गत कचरा वर्गीकरण, कंपोस्टिंग आणि प्लास्टिकमुक्तीविषयी जनजागृती करण्यात येईल. निवडणूक विभागाच्या स्टॉलवर मतदार नोंदणी आणि एसआयआर प्रक्रियेबाबत माहिती असणार आहे. उद्यान विभागाच्या वतीने वृक्षारोपण आणि वृक्ष दत्तक योजनेची माहिती दिली जाईल. या उपक्रमांतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात २५ वृक्ष दत्तक योजनेसाठी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. समाजविकास विभागाच्या स्टॉलवर ज्येष्ठ नागरिक आणि एकल महिलांसाठीच्या योजनांची माहिती, डिजिटल साक्षरता आणि सायबर फसवणुकीबाबत जागरूकता निर्माण करण्यात येईल. दिव्यांग सुविधा विभागाच्या स्टॉलवर दिव्यांगांसाठी उपलब्ध सुविधांची माहिती दिली जाईल, तर सामान्य प्रशासन विभागाच्या स्टॉलवर महापालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवांची माहिती देण्याबरोबरच सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी नागरिकांच्या सूचना मागविण्यात येणार आहेत. दुपारी २ वाजता समारोप व आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता होईल.

सेवा संकल्प अभियानांतर्गत निबंध स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी नागरिकांकडून २१ ऑक्टोबरपर्यंत निबंध मागविण्यात येणार आहेत. विकसित भारत २०४७, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डिजिटल साक्षरता हे निबंध स्पर्धेचे विषय निश्चित करण्यात आले आहेत. निबंध लेखनासाठी १००० शब्दांची मर्यादा असणार आहे. या विषयावरील निबंध नागरिकांनी महापालिकेच्या जनसंपर्क कार्यालयात २१ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उष्माघातापासून बचावासाठी पनवेल मनपाचे सतर्कतेचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून तापमान वाढीमुळे नागरिकांनी आरोग्याबाबत अधिक सतर्क राहून आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. उष्माघातामुळे शरीराचे तापमान वाढणे, चक्कर येणे, मळमळ होणे, उलटीचा त्रास होणे तसेच निर्जलीकरण यांसारखी लक्षणे दिसून येऊ शकतात. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी उष्माघातापासून बचाव करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी नागरिकांनी शक्यतो कडक उन्हात बाहेर पडणे टाळावे. बाहेर जाणे आवश्यक असल्यास डोक्यावर टोपी, छत्री किंवा गॉगलचा वापर करावा. हलक्या रंगाचे, सैल आणि सुती कपडे परिधान करावेत. प्रवासादरम्यान पाण्याची बाटली सोबत ठेवावी आणि शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी नियमितपणे पुरेसे पाणी प्यावे, असे आवाहन मुख्य वैद्यकीय अधिकारी आनंद गोसावी यांनी केले आहे. आहाराबाबत घ्यावयाची काळजीआहारात फळे, पालेभाज्या आणि पाण्याचे प्रमाण अधिक असलेल्या पदार्थांचा समावेश करावा. चहा, कॉफी आणि कॅफिनयुक्त शीतपेयांचे अतिसेवन टाळावे. तसेच जास्त प्रमाणात तळलेले व शिळे अन्न खाणे टाळावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण संतुलित ठेवण्यासाठी योग्य आहार आणि पुरेसे द्रवपदार्थ घेणे महत्त्वाचे आहे.

उष्माघाताची लक्षणे ओळखाशरीराचे तापमान सुमारे १०४ अंश फॅरेनहाइटपर्यंत वाढणे, तीव्र डोकेदुखी, स्नायूंमध्ये आखडणे, मळमळ, उलटी, चक्कर येणे, गोंधळल्यासारखे वाटणे आणि हृदयाचे ठोके वाढणे ही उष्णतेशी संबंधित आजारांची गंभीर लक्षणे असू शकतात. लहान मुलांमध्ये भूक मंदावणे, चिडचिड होणे, लघवीचे प्रमाण कमी होणे, डोळे कोरडे पडणे आणि तोंड कोरडे होणे अशी लक्षणे दिसू शकतात. उष्णतेचा त्रास जाणवणाऱ्या व्यक्तीला तातडीने सावलीत किंवा थंड ठिकाणी न्यावे. शरीराचे तापमान कमी करण्यासाठी थंड पाण्याने ओले केलेले कापड वापरावे आणि पंख्याद्वारे हवा द्यावी.

व्यक्ती शुद्धीत असल्यास आणि व्यवस्थित गिळू शकत असल्यास पाणी द्यावे. व्यक्ती बेशुद्ध असल्यास किंवा गोंधळलेल्या अवस्थेत असल्यास तोंडाने काहीही देऊ नये. अशा वेळी तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी. उष्माघाताची शंका असल्यास उपचारासाठी विलंब करू नये. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेर उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. घराबाहेरील कामे शक्यतो थंड वेळेत करावीत आणि कामाच्या दरम्यान नियमित विश्रांती घ्यावी. उष्णतेचा त्रास झालेल्या व्यक्तीला मदत करताना तिला थंड ठिकाणी हलवणे आणि वेळेवर वैद्यकीय उपचार मिळवून देणे आवश्यक आहे.

नागरिकांनी उष्माघाताचा त्रास झाल्यास नजीकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करावी. नागरिकांनी उष्णतेच्या लाटेच्या काळात आरोग्यविषयक सूचनांचे पालन करावे. स्वतःची तसेच कुटुंबीयांची काळजी घ्यावी आणि उष्माघातापासून बचावासाठी सतर्क राहावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# दोनदा जमीन विक्री करून फसवणूक

**नवीन पनवेल** : जमिनीची दुसऱ्यांदा विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी नांदगाव येथील ५२ वर्षीय शेतकऱ्याविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात १३ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नांदगाव येथील शेतकऱ्याने त्याची १४.९ गुंठे जमीन ८ फेब्रुवारी २००७ रोजी दिनेश शहा यांना मोबदला घेऊन नोंदणीकृत साठेकराराने विक्री केली होती. पहिला व्यवहार सुरू असताना त्याच जमिनीची पुन्हा मदन कोळंबेकर (रा. नेरूळ) यांच्याकडून संपूर्ण मोबदला स्वीकारून ४ मार्च २००८ रोजी नोंदणीकृत साठेकराराने विक्री करून फसवणूक केल्याचा आरोप आहे.

# ‘मराठी माझी देवालाही आवडे’चा रसिक प्रेक्षकांनी लाभ घ्यावा –लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी भाषा, संतसाहित्य आणि संगीत परंपरेचा समृद्ध वारसा उलगडणारा मराठी माझी देवालाही आवडे हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम शनिवारी (दि. १७) दुपारी ४ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे निमंत्रण निमंत्रक म्हणून पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांना देण्यात आले.

यावेळी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, कार्यकारिणी सल्लागार विवेक पाटील, संजय कदम, मंदार दोंदे, संजय सोनावणे, सचिव हरेश साठे, खजिनदार दत्तात्रेय कुलकर्णी, प्रवीण मोहोकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

संतसाहित्य आणि संगीताच्या माध्यमातून अभिजात मराठी भाषेचा सांस्कृतिक प्रवास रसिकांसमोर उलगडणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मराठी भाषेतील भक्तिरचना, संतवाङ्मय आणि संगीत परंपरेतील भावसौंदर्य यांचा सुरेल संगम या कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे. मराठी भाषेची थोरवी, संतांच्या विचारांचा अमूल्य ठेवा आणि संगीताची भावस्पर्शी परंपरा यांचा आस्वाद घेण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. त्या अनुषंगाने मराठी भाषा आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी केले.





पनवेल : भाजप युवा मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष रोहित कोळी यांनी वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी युवा मोर्चा सरचिटणीस सिद्धेश खानावकर, सौरभ टकले, राहुल पवार आदी उपस्थित होते. आपल्या वाढदिवशी पुष्पगुच्छ किंवा भेटवस्तू न स्वीकारता वह्या व पेन शुभेच्छारूपी देण्याचे आवाहन कोळी यांनी केले होते. त्याला प्रतिसाद देत जमा झालेल्या सर्व वह्या, पेन गरजू विद्यार्थ्यांना वाटण्यात येणार आहेत. याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले.

# कळंबोलीत न्यायसखी महिला, बाल अत्याचार निवारण समितीचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिला व बालकांवरील अत्याचारांना आळा घालणे आणि पीडितांना न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या न्यायसखी महिला व बाल अत्याचार निवारण समितीचे उद्घाटन कळंबोलीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते झाले.

समितीच्या अध्यक्ष अॅड. भूमिका जाधव यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे सभागृहनेते प्रकाश बिनेदार, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक रामदास शेवाळे, नगरसेविका लीना म्हात्रे, रिपाइंचे प्रवक्ते प्रा. मोहन गायकवाड, तालुकाध्यक्ष विजय पवार, वाहतूक सेनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, सुभाष गायकवाड, भाजप नेते संतोष पाटील, अॅड. विवेक भोपी यांच्यासह सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून समाजहितासाठी योगदान देणाऱ्या पत्रकारांचा न्यायसखी सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.




# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराबद्दल सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संघर्षाच्या वाटेवरून कर्तृत्वाची शिखरे सर करताना आपल्या यशाचा प्रत्येक टप्पा समाजाच्या सेवेसाठी समर्पित करणारे, गोरगरिबांच्या आयुष्यात आशेचा दीप प्रज्वलित करणारे आणि दानशूरपणातून माणुसकीचा वसा जपणारे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना नुकतेच प्रतिष्ठेच्या शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानानिमित्त पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या प्रदीर्घ सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी कार्याचा गौरव करण्यात आला.

यावेळी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, कार्यकारिणी सल्लागार विवेक पाटील, संजय कदम, मंदार दोंदे, संजय सोनावणे, सचिव हरेश साठे, खजिनदार दत्तात्रेय कुलकर्णी, प्रवीण मोहोकर आदी पदाधिकारी तसेच भाजपचे युवा नेते संजय जैन, पत्रकार अप्पासाहेब मगर, आपले रायगडचे संपादक सुनील वारगडा उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सन्मान केवळ एका व्यक्तीच्या कर्तृत्वाचा गौरव नव्हे, तर संघर्षातून उभे राहून समाजाच्या सुख-दुःखाशी आपले नाते घट्ट करणाऱ्या सेवाव्रती विचारांचा सन्मान आहे. मोठेपणाचा अभिनिवेश न बाळगता सामान्य माणसांमध्ये सहजपणे मिसळणे, गरजूंच्या अडचणी जाणून घेणे आणि मदतीची हाक येण्यापूर्वीच शक्य ते सहकार्य करण्यासाठी पुढे सरसावणे ही लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या दातृत्वाला केवळ आर्थिक मदतीची मर्यादा नाही, तर त्यामागे माणसांप्रति असलेली आस्था, सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव आणि समाजाने दिलेले समाजालाच परत करण्याची उदात्त भावना आहे. त्यामुळेच अनेक गरजू कुटुंबांसाठी ते आधारवड, विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण, तर समाजातील विविध घटकांसाठी विश्वासाचे नाव बनले आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. याशिवाय आरोग्य, क्रीडा, कला, संस्कृती आणि सामाजिक उपक्रमांना दिलेले पाठबळ त्यांच्या सेवाकार्याची व्याप्ती अधोरेखित करते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनप्रवासात कष्ट, जिद्द, संघर्ष आणि समाजाप्रति असलेली निष्ठा यांचा सुरेख संगम पाहायला मिळतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून सुरुवात करून त्यांनी व्यावसायिक क्षेत्रात यश मिळविले, मात्र यशाच्या शिखरावर पोहचल्यानंतरही सामान्य माणसांशी असलेली नाळ त्यांनी कधीही तुटू दिली नाही.

भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी झालेल्या आंदोलनांमध्ये सहभाग घेत त्यांनी जनतेच्या प्रश्नांशी आपली बांधिलकी जपली. लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना जनहिताला प्राधान्य दिले आणि निवडणुकीच्या राजकारणापासून दूर झाल्यानंतरही समाजकार्यातील आपला सक्रिय सहभाग कायम ठेवला असून त्यांचा पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने करण्यात आलेला हा सत्कार म्हणजे समाजहितासाठी आयुष्यभर योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वाप्रति व्यक्त केलेली कृतज्ञता आहे. दरम्यान, या सत्काराबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचचे आभार व्यक्त केले तसेच मंचाच्या वतीने आयोजित कार्यक्रमांचे कौतुकही केले.



## संपादकीय

# सामंजस्यातूनच सोडवणूक!

दुष्काळात शेतकऱ्यांना मदत मिळणे आणि साखर उद्योगाचे आर्थिक चक्रही सुरळीत राहणे या दोन्ही बाबी आवश्यक आहेत. सरकारने दाखवलेली तत्परता आणि मुख्यमंत्र्यांनी केलेले सामंजस्याचे आवाहन यांना सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यासच बळीराजाच्या हिताचे संतुलित समाधान साधता येईल.

**महाराष्ट्रातील यंदाची दुष्काळी परिस्थिती शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने बळीराजाला तातडीचा दिलासा देण्यासाठी काही महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जमा करण्याची घोषणा ही केवळ आर्थिक मदतीची बाब नसून, संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याच्या सरकारच्या भूमिकेचे प्रतीक आहे. राज्यात सुरुवातीला २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले होते. मात्र इतरही भागांत पावसाचा मोठा खंड पडल्याने अनेक तालुक्यांमधून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत होती. तेथील परिस्थितीचा आढावा घेऊन आणखी ४० तालुक्यांचा यात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील एकूण ३०५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित झाले आहेत. पावसाची तूट, घटती भूजल पातळी, पिण्याच्या पाण्याची समस्या आणि जनावरांच्या चाऱ्याची चिंता या पार्श्वभूमीवर सरकारने ऑक्टोबरमध्येच यासंदर्भात निर्णय घेतला आहे. ही तत्परता महत्त्वाची आहे. दुष्काळग्रस्तांना मिळणाऱ्या १२ सवलतींची अंमलबजावणी, पीककर्जाच्या पुनर्गठनाची प्रक्रिया, वीजबिलांबाबत दिलासा, जमीन महसुलातील सवलती आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कमाफीवरील अटी हटवण्याचा निर्णय यामुळे शेतकरी कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची संख्या वाढवणे आणि चाऱ्याच्या खरेदीची तयारी हेही संकटाचे गांभीर्य ओळखून केलेले उपाय आहेत. विरोधकांनी मात्र मदत तुटपुंजी असल्याची टीका करीत शेतकऱ्यांना २५ हजार रुपयांची अग्रीम मदत द्यावी, हेक्टरची मर्यादा न ठेवता मदत करावी आणि मनरेगाची कामे २०० दिवस सुरू ठेवावीत आदी मागण्या केल्या आहेत. शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेता अधिक मदतीच्या मागण्यांवर चर्चा होणे आवश्यकच आहे. मात्र, केवळ मोठ्या आकड्यांची घोषणा करण्यापेक्षा उपलब्ध संसाधने, प्रत्यक्ष नुकसान आणि मदतीचे वेळापत्रक यांचा विचार करून वेगाने निर्णय घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सरकारने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची मदत ही अंतिम मदत नसून, व्यापक मदतप्रक्रिया पूर्ण होईपर्यंतचा तातडीचा आधार आहे. दरम्यान, ऊसदरावरून माजी खासदार राजू शेट्टी यांनी प्रतिटन ५५०० रुपयांच्या मागणीसाठी आंदोलनाची भूमिका घेतली असून साखर कारखाने बंद पाडण्याचा इशारा दिला आहे. ऊस उत्पादकांना रास्त दर मिळावा ही मागणीही चर्चेतून सोडवता येऊ शकते. मात्र, यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत साखर कारखान्यांसमोरही अडचणी आहेत. राज्यातील कारखाने असे बंद राहतात तेव्हा कर्नाटकातील कारखाने आपला ऊस घेऊन सुरू राहतात. तसे झाल्यास महाराष्ट्रातील कारखान्यांचा हंगाम कमी होण्याची शक्यता मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केली आहे व सर्व संबंधितांना सामंजस्याची भूमिका घेण्याचे आवाहन केले आहे. शेतकरी, साखर कारखानदार आणि सरकार यांच्यात संघर्षापेक्षा संवाद आवश्यक आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नसून जलसंधारण, पाण्याचे नियोजन आणि ठिबक सिंचनासारख्या उपायांना प्राधान्य देणेही आवश्यक आहे. सरकारच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचवणे, तसेच नुकसानभरपाईची प्रक्रिया सुलभ करणे यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळेल. तातडीच्या मदतीसोबतच दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देणे ही काळाची गरज आहे.**

# वाचन प्रेरणा दिन : पुस्तकांच्या पलीकडे विवेकाचा शोध!

माहितीच्या महासागरात ज्ञानाचा दीप आणि मतांच्या कोलाहलात विवेकाचा आवाज बनण्याची क्षमता वाचनात आहे. म्हणून वाचन हा केवळ छंद नाही, तर व्यक्तीच्या बौद्धिक स्वातंत्र्याचा आणि समाजाच्या वैचारिक आरोग्याचा मूलाधार आहे. दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि प्रेरणादायी विचारवंत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला जातो. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचनसंस्कृतीचा विकास व्हावा आणि ज्ञानाच्या साधनेशी नव्या पिढीचे नाते अधिक दृढ व्हावे, या उद्देशाने या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र या दिवसाचे खरे औचित्य भाषणांमध्ये, पुस्तक प्रदर्शनांमध्ये किंवा एक दिवसाच्या वाचन उपक्रमांमध्ये नसून, त्या निमित्ताने निर्माण होणाऱ्या दीर्घकालीन वाचनसंस्कृतीत आहे. वाचन प्रेरणा दिनाच्या औचित्याने आपण वाचनाचा उत्सव साजरा करतो आहोत, की वाचणारा समाज घडविण्याच्या दिशेने प्रत्यक्ष पावले टाकतो आहोत याचे चिंतन करणे गरजेचे आहे.

आज माणसाच्या हातात जग आले आहे, पण त्या जगाचा अर्थ समजून घेण्यासाठी आवश्यक असलेली विचारांची खोली त्याच्याकडे आहे का? एका स्पर्शात हजारो माहितीचे तुकडे उपलब्ध होतात. काही सेकंदांत बातम्या, मते, विश्लेषणे, छायाचित्रे आणि चित्रफिती आपल्या डोळ्यांसमोरून सरकतात. माहितीचा वेग अभूतपूर्व आहे. मात्र या वेगाच्या धावपळीत विचार करण्यासाठी आपण थांबतो का? वाचलेल्या मजकुरामागील सत्य तपासतो का? आपल्या मतांपेक्षा वेगळा विचार समजून घेण्याचा प्रयत्न करतो का? हे प्रश्न केवळ शिक्षणव्यवस्थेपुढील नाहीत, तर संपूर्ण समाजापुढील आहेत. कारण वाचनाचा संबंध अक्षर ओळखीपुरता मर्यादित नसतो. तो माणसाच्या विचारक्षमतेशी, संवेदनशीलतेशी, निर्णयक्षमतेशी आणि लोकशाहीतील सहभागाशी जोडलेला असतो. म्हणूनच 'वाचन प्रेरणा दिन' हा केवळ औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसून आपल्या वैयक्तिक आणि सामूहिक जीवनात वाचनाचे स्थान पुन्हा तपासण्याचा दिवस आहे.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्ञान, जिज्ञासा, वैज्ञानिक दृष्टिकोन, साधेपणा आणि स्वप्नशीलता यांचा सुंदर संगम. विज्ञानाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान, भारताच्या क्षेपणास्त्र आणि अवकाश संशोधन कार्यक्रमांतील त्यांची भूमिका, राष्ट्रपती म्हणून त्यांनी तरुणांशी साधलेला संवाद आणि विद्यार्थ्यांच्या क्षमतेवरील त्यांचा दृढ विश्वास यांमुळे ते देशाच्या सार्वजनिक जीवनातील एक महत्त्वाचे प्रेरणास्थान ठरले. मोठी स्वप्ने पाहण्यासाठी कल्पनाशक्ती आवश्यक असते. परंतु त्या स्वप्नांना वास्तवात उतरविण्यासाठी ज्ञान, जिज्ञासा, परिश्रम आणि सातत्यपूर्ण अध्ययन आवश्यक असते याचा कृतीशील वस्तूपाठ त्यांनी समजावून दिला. डॉ.कलाम यांचे स्मरण करताना त्यांच्या ज्ञानकेंद्री जीवनदृष्टीला आपल्या दैनंदिन आचरणात स्थान देणे ही त्यांना वाहिलेली अधिक अर्थपूर्ण आदरांजली ठरेल. त्यांच्या जयंतीचा दिवस प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक, प्रत्येक शिक्षकाच्या अध्यापनात जिज्ञासा आणि प्रत्येक शैक्षणिक संस्थेच्या वातावरणात मुक्त विचार घेऊन आला, तर वाचन प्रेरणा दिनाचे प्रयोजन खऱ्या अर्थाने साध्य होईल.

साहित्यवाचन माणसाला दुसऱ्याच्या जागी उभे राहून विचार करण्याची संधी देते. एखाद्या कथेतून वंचित व्यक्तीचे जगणे समजते, कवितेतून एखाद्या वेदनेला शब्द मिळतात, तर आत्मचरित्रातून संघर्षाचे अदृश्य पैलू समोर येतात. यामुळे सहानुभूती, संवेदनशीलता आणि मानवी संबंधांविषयीची समज विकसित होण्यास मदत होते. मात्र, वाचनामुळे पुस्तकात मांडलेला दावा कितपत विश्वासार्ह आहे, त्यामागे कोणते पुरावे आहेत, लेखक कोणत्या दृष्टिकोनातून लिहितो आणि त्याच्या युक्तिवादात कोणत्या मर्यादा आहेत, हे तपासणेही तितकेच आवश्यक आहे. वाचनाचे अंतिम यश किती पाने वाचली यावर ठरत नाही; तर त्या वाचनामुळे आपल्या विचारांत किती स्पष्टता, प्रश्नांत किती खोली आणि दृष्टिकोनात किती विवेक निर्माण झाला, यावर ठरते.

महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात ज्ञान, शिक्षण आणि विचारस्वातंत्र्य यांचा प्रश्न नेहमीच परिवर्तनाशी जोडलेला आहे. संतपरंपरेने लोकभाषेतून तत्त्वज्ञान आणि जीवनमूल्ये सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविली. आधुनिक काळातील समाजसुधारकांनी शिक्षण आणि ज्ञानप्राप्तीला सामाजिक विषमतेविरुद्धच्या संघर्षाचे महत्त्वाचे साधन बनविले.वाचनसंस्कृती समृद्ध व्हायची असेल, तर समाजातील विविध घटकांच्या अनुभवांना स्थान देणारे साहित्य वाचकांपर्यंत पोहोचले पाहिजे. दलित साहित्य, स्त्रीवादी लेखन, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, लोकसाहित्य, विज्ञानलेखन आणि विविध भाषांतील अनुवादित साहित्य यांचे वाचन वाचकाला समाजाचे अधिक व्यापक आणि बहुआयामी चित्र समजून घेण्यास मदत करते. वाचनाची खरी लोकशाही म्हणजे सर्वांनी एकच पुस्तक वाचणे नव्हे; तर प्रत्येकाला दर्जेदार साहित्यापर्यंत पोहोचण्याची संधी मिळणे, विविध विचारांशी परिचित होता येणे आणि स्वतःची स्वतंत्र भूमिका विकसित करण्याचे स्वातंत्र्य मिळणे होय.

आजच्या पिढीसमोर वाचनाचा प्रश्न एका नव्या स्वरूपात उभा आहे. पूर्वी पुस्तकांपर्यंत पोहोचण्याची अडचण मोठी होती, आज अनेकदा पुस्तकांसाठी वेळ आणि एकाग्रता मिळविणे हे आव्हान बनले आहे. स्मार्टफोन, समाजमाध्यमे, लघुचित्रफिती, सतत येणाऱ्या सूचना आणि वेगाने बदलणाऱ्या डिजिटल आशयामुळे आपले लक्ष अनेक दिशांनी खेचले जाते. या परिस्थितीचे विश्लेषण करताना तंत्रज्ञानाला सरसकट दोष देणे योग्य ठरणार नाही. डिजिटल माध्यमांमुळे दुर्मीळ पुस्तके उपलब्ध होऊ शकतात, ई–पुस्तकांच्या माध्यमातून दूरस्थ वाचकांपर्यंत साहित्य पोहोचू शकते, ध्वनिपुस्तकांमुळे वाचनाचे नवे मार्ग उपलब्ध होतात आणि ऑनलाइन ग्रंथालयांमुळे ज्ञानाच्या संधी वाढतात. समस्या तंत्रज्ञानाच्या अस्तित्वात नसून त्याच्या वापराच्या स्वरूपात आहे.डिजिटल युगात ही क्षमता विकसित करण्यासाठी सखोल वाचनाचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट, चुकीची माहिती, दिशाभूल करणारे संदेश आणि अप्रमाणित दावे वेगाने पसरत असताना चिकित्सक वाचनाची गरज अधिक वाढली आहे.

एखादी माहिती वाचल्यावर तिचा स्रोत कोणता, तिच्या समर्थनार्थ पुरावे कोणते, इतर विश्वासार्ह स्रोत काय सांगतात आणि ती माहिती कोणत्या संदर्भात मांडली आहे, हे तपासण्याची सवय लावणे आवश्यक आहे. शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांना तथ्य आणि मत यांतील फरक, माहितीची पडताळणी आणि तर्कशुद्ध विचार यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने म्हणूनच मुद्रित पुस्तक आणि डिजिटल माध्यम यांच्यात संघर्ष उभा करण्याऐवजी दोन्हींचा विवेकी समन्वय साधण्याची गरज आहे. माध्यम कोणतेही असो, वाचनातून विचार करण्याची सवय विकसित झाली पाहिजे.

मुलांना वाचनाची सवय लागावी, अशी अपेक्षा प्रत्येक पालक आणि शिक्षक व्यक्त करतो. मात्र एक महत्त्वाचा प्रश्न विचारायला हवा : मुलांच्या दैनंदिन जीवनात पुस्तकाला आनंददायी स्थान देणारे वातावरण आपण निर्माण केले आहे का? घरात अभ्यासासाठी वेळ ठरविला जातो, पण मुक्त वाचनासाठी वेळ राखून ठेवला जातोच असे नाही. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील धडे वाचायला सांगितले जाते परंतु त्यांच्या आवडीचे पुस्तक निवडण्याचे स्वातंत्र्य किती वेळा दिले जाते? पुस्तक वाचल्यानंतर त्यांना स्वतःचे मत मांडता येते का, की प्रत्येक वाचनाचा शेवट प्रश्नोत्तरांच्या सरावात होतो? वाचनाची सवय उपदेशाने नव्हे, तर अनुभवाने अधिक प्रभावीपणे विकसित होते. मुलांना गोष्टी ऐकविणे, चित्रपुस्तके उपलब्ध करून देणे, त्यांच्या आवडीनुसार पुस्तके निवडू देणे, वाचलेल्या कथांवर संवाद साधणे आणि पालकांनी स्वतः वाचन करणे या साध्या गोष्टींचा मोठा परिणाम होऊ शकतो.

शाळांनीही ग्रंथालयाला केवळ पुस्तकसंग्रहाची जागा न मानता विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेचे केंद्र बनविले पाहिजे. दररोज काही वेळ मुक्त वाचनासाठी राखून ठेवणे, विद्यार्थ्यांना स्वतः पुस्तके निवडू देणे, पुस्तक परिचय आणि गटचर्चा आयोजित करणे, वाचलेल्या पुस्तकांविषयी लेखन करण्याच्या संधी देणे आणि शिक्षकांनी स्वतः वाचनाचा आदर्श निर्माण करणे, अशा उपायांनी शाळेतील वाचनसंस्कृती समृद्ध होऊ शकते. शिक्षणाचा उद्देश केवळ परीक्षा उत्तीर्ण होणारा विद्यार्थी निर्माण करणे नसून आयुष्यभर शिकत राहणारा माणूस घडविणे हा आहे. अभ्यासक्रम संपतो; पण ज्ञानाचा प्रवास संपत नाही. त्या प्रवासासाठी वाचनाची सवय ही सर्वांत टिकाऊ शिदोरी ठरू शकते.

डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा वाचन प्रेरणा दिन आपण केवळ औपचारिकतेत घालवू नये. या दिवशी एक पुस्तक निवडूया, त्यातील विचार समजून घेऊया, आपल्या मुलांना पुस्तकांची भेट देऊया, ग्रंथालयाकडे पावले वळवूया आणि वाचलेल्या विचारांवर संवाद साधूया. पुस्तकांच्या पानांतून उजळणारा हा विवेकाचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत, प्रत्येक शाळेपर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहचला, तर वाचन प्रेरणा दिन खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल.

**–डॉ.राजेश पाटील,**
**सहाय्यक ग्रंथालय संचालक,**
**अमरावती विभाग, अमरावती**



## बदलते तंत्रज्ञान

# 'या' ट्रिकने डिलीट केलेला व्हॉट्सअॅप मेसेज वाचू शकता

व्हॉट्सअॅप आपल्या युजर्ससाठी नवनवीन फिचर आणि ट्रिक्स आणत असते. वापरकर्त्यांना त्यांचा चांगला फायदा होत असतो. त्यामुळेच व्हॉट्सअॅप अनेकांसाठी उपयुक्त ठरते. व्हॉट्सअॅप डिलीट केलेल्या मेसेजमध्ये काय होते हे जाणून घेण्याची काही लोकांची खूप इच्छा आहे. जर तुम्हीही अशा लोकांमध्ये असाल तर तुम्हाला डिलीट केलेल्या मेसेजबद्दल अगदी सहज माहिती मिळेल.





तुम्हाला डिलीट केलेले व्हॉट्सअॅप मेसेजदेखील वाचायचे असतील तर तुम्ही आता डिलीट केलेले व्हॉट्सअॅप मेसेज सहज वाचू शकता.

व्हॉट्सअॅप वर डिलीट फॉर एव्हरीवन नावाचे फीचर येतं. या फीचरच्या मदतीने तुम्ही पाठवलेला मेसेज डिलीट करू शकता.

या फीचरनंतर अनेक लोक मेसेज पाठवतात आणि ठराविक वेळेत डिलीट करतात. असं केल्याने काही युजर्स नाराज होतात.डिलीट केलेल्या मेसेजमध्ये काय होते हे जाणून घेण्याची त्यांची खूप इच्छा आहे. जर तुम्हीही अशा लोकांमध्ये असाल तर तुम्हाला डिलीट केलेल्या मेसेजबद्दल अगदी सहज माहिती मिळेल.

यासाठी तुम्हाला फोनमध्ये असलेली एक सेटींग ऑन करावी लागेल. तुम्हाला तुमच्या फोनमध्ये नोटिफिकेशन्स हिस्ट्री ऑन करावी लागेल, ज्यामुळे तुम्हाला सर्व माहिती मिळेल.

अशा परिस्थितीत, एखादा व्हॉट्सअॅप मेसेज पाठवल्यानंतर तो डिलीट केला तरी तुम्ही तो नोटिफिकेशन हिस्ट्रीमध्ये वाचू शकता.

लक्षात ठेवा की, तुम्ही नोटिफिकेशन हिस्ट्रीमध्ये कोणताही ऑडिओ मेसेज, व्हिडीओ किंवा फोटो ऍक्सेस करू शकणार नाही. तुम्ही फक्त मेसेज वाचू शकता.

तुम्ही नोटिफिकेशन बारमधून थेट हिस्ट्रीवर जाऊ शकता किंवा सेटिंग्जमध्ये हा ऑप्शन ओपन करू शकता. येथे तुम्हाला २४ तासांपर्यंतची हिस्ट्री मिळेल.

# विनोदी लेखक, नाटककार वसंत सबनीस



## निमित्त

रघुनाथ दामोदर सबनीस उर्फ वसंत सबनीस हे मराठी विनोदकार आणि नाटककार होते. त्यांचा आज स्मृतीदिन आहे. वसंत सबनीस यांचा जन्म ६ डिसेंबर १९२३ रोजी सोलापूर येथे झाला. ते पंढरपूरच्या लोकमान्य हायस्कूलमधून मॅट्रिक (१९४२), पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून बी.ए. (१९४६) झाले. शासकीय नोकरीत असताना ते साहित्यनिर्मितीही करीत. त्यांच्या कविता अभिरूचीसारख्या दर्जेदार नियतकालिकातून प्रसिद्ध होत. पुढे ते विनोदी लेखक म्हणून प्रसिद्धीला आले. रंगभूमीवर त्यांची नाटकेही गाजली.

'पानदान' हा त्यांचा ललित लेखसंग्रह १९५८मध्ये प्रसिद्ध झाला. त्यांच्या विनोदी लेखसंग्रहांपैकी 'चिल्लरखुर्दा' (१९६०), 'भारूड' (१९६२), 'मिरवणूक' (१९६५), 'पंगत' (१९७८), 'आमची मेली पुरुषाची जात' (२००१) हे प्रसिद्ध लेखसंग्रह होत. 'आत्याबाईला आल्या मिशा' (१९८५), 'विनोदी द्वादशी' (१९८८), 'बोका झाला संन्यासी' (२००१) हे त्यांचे काही विनोदी कथासंग्रह. 'निळावंती' (१९६३), 'म्हैस येता घरा' (१९६९), 'सौजन्याची ऐशी तैशी' (१९७५), 'घरोघरी हीच बोंब' (१९७७), 'मामला चोरीचा' (१९८६), 'कार्टी श्रीदेवी' (१९८८), 'गेला माधव कुणीकडे' (१९९४) ही त्यांची रंगभूमीवर गाजलेली नाटके. 'विच्छा माझी पुरी करा' (१९६८) या त्यांच्या लोकनाट्याने यशस्वितेचा विक्रम केला.

ते प्रथम वीणा मासिकातून 'छपरी पलंगाचा वग' या शीर्षकाने प्रसिद्ध झाले. तमाशा या लोककलाप्रकाराला आधुनिक रूप देण्याचा पहिला महत्वाचा प्रयत्न म्हणून हा वग उल्लेखनीय ठरतो. दादा कोंडके, राम नगरकर या अभिनेत्यांची सबनीसांच्या उत्कृष्ट, चुणचुणीत संवादांना समर्थ साथ मिळाली. मार्मिक राजकीय भाष्य आणि चतुर संवाद हे या लोकनाट्याचे वैशिष्ट्य. त्यांच्या दोन विनोदी नाट्यकृतींना १९६३ व १९७२ चे महाराष्ट्र राज्याचे उत्कृष्ट वाङ्मयीन पुरस्कार लाभले. ते किशोर मासिकाचे संपादक होते. विनोदी लेखकाला जीवनाकडे, त्यातील विसंगतींकडे पाहण्याचा वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोण, मार्मिक निरीक्षणशक्ती आणि सहज, उत्स्फूर्त शैली यांमुळे त्यांच्या लेखनाला जिवंतपणाचा, रसरशीत स्पर्श असे. अशा या श्रेष्ठ नाटककाराचे १५ ऑक्टोबर २००२ रोजी निधन झाले.

वसंत सबनीस हे मराठी साहित्यिक, नाटककार होते. लेखक, विनोदी नाटककार, ग्रामीण कथेला विनोदी बाज देणारे कथाकार व पटकथालेखक म्हणून वसंत सबनीस महाराष्ट्रात गाजले होते. त्यांचे मूळ नाव रघुनाथ दामोदर सबनीस होते. चिल्लरखुर्दा (१९६०), भारूड (१९६२), मिरवणूक (१९६५), पंगत (१९७८), आमची मेली पुरुषाची जात (२००१) हे प्रसिद्ध लेखसंग्रह होत. त्यांच्या कथांवरून 'एकटा जीव सदाशिव', 'सोंगाड्या' हे दादा कोंडकेनिर्मित चित्रपट बनले. 'अशी ही बनवाबनवी','एकापक्षा एक', गंमत जंमत', 'नवरी मिळे नवऱ्याला', 'बाळाचे बाप ब्रह्मचारी' ह्या सचिन पिळगावकर यांची प्रमुख भूमिका असलेल्या चित्रपटांच्या कथा–पटकथा सबनीसांच्या होत्या.

पंढरपूरच्या लोकमान्य हायस्कूलमधून वसंत सबनीस १९४२ साली मॅट्रिक झाले. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून १९४६ साली बी.ए. झाल्यावर सबनीसांनी आयुष्यभर सरकारी नोकरी केली. नोकरी सांभाळून त्यांनी काव्यलेखनाने मराठी साहित्याच्या सेवेचा आरंभ केला. पुढे ते ललित आणि विनोदी लेखनाकडे वळले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# जन्मावेळी बाळाचं वजन कमी असल्याचे तोटे काय?



सामान्यपणे वेळेवर जन्मलेल्या बाळाचे वजन जन्माच्या वेळी २.५ किलोपेक्षा अधिक असायला हवे. जी मुलं दहाव्या महिन्यात जन्माला येतात त्यांचे वजन ३ ते ४ किलोपर्यंतदेखील वाढलेले असते. त्याच्या उलट जी मुले वेळेआधीच जन्माला येतात. म्हणजेच सातव्या किंवा आठव्या महिन्यात जन्माला येतात त्या बाळांचे वजन सामान्य वजनापेक्षा कमी असते. तरीही जन्मावेळी बाळाचे वजन २.५ ते ३ किलो असेल तर ते योग्य मानले जाते. तर १.५ किलोहून कमी वजनाच्या बाळाला लो बर्थ वेट बेबी म्हटले जाते.

जन्माच्या वेळी बाळाचे वजन कमी असणे योग्य मानले जात नाही. अनेकदा काही अवयव नीटसे विकसित झाल्याने आणि वेळे आधी जन्माला आल्याने वजन कमी भरते. अशा बाळांना अधिक काळजीची गरज असते. कारण अशी मुले स्वत:हून दूध पिण्याच्या स्थितीत नसतात. अनेकदा अशा बाळांना श्वासदेखील घेता येत नाही. अशा नवजात शिशूंना पीडीयाट्रीक इंटेन्सिव्ह केअर युनिटमध्ये सपोर्ट सिस्टीमवर ठेवले जाते. तेथे मशिनद्वारे त्यांची काळजी घेतली जात असते.

कमी वजनाच्या बाळाला इतर सामान्य वजनाच्या बाळांच्या तुलनेत काविळ होण्याचा धोका सर्वाधिक असतो. अशा बाळांचे शरीर जन्माच्यावेळी पिवळे पडते. या बाळात बिलीरुबिनची कमतरता असते. या बाळांना फोटोथेरपी दिली जाते.

हा एक प्रकारचा उपचार असून यात बाळांना इन्क्युबेटरच्या प्रकाशात बाळांना ठेवले जाते. त्याचे डोळे झाकले जातात. त्यामुळे तीव्र प्रकाशापासून डोळ्यांचे रक्षण होते, परंतू उर्वरित शरीराला लाभ होतो. त्यानंतर बिलीरुबिन चेक केले जाते. अन्यथा बाळांना अधिक काळ रुग्णालयात राहावे लागू शकते.

लहान मुलाला सर्वसामान्यत: इन्फेक्शनचा धोका असतो. परंतू ज्या बाळाचे वजन सामान्यपेक्षा कमी असते. त्यांची इम्युनिटी खूपच कमी असते. त्यांना वारंवार इन्फेक्शन होण्याचा शक्यता असते.

मातेने बाळाच्या जन्मावेळी योग्य आहारात करावा. आणि वेळोवेळी अल्ट्रासाउंड सोनोग्राफीच्या मदतीने बाळाच्या वजनाची खात्री करावी, त्यामुळे बाळाच्या जन्मावेळी त्याचे वजन योग्य राहते आणि आरोग्यदायी बाळ जन्माला येते.

# पनवेलमध्ये चिमुरडीच्या अपहरणाचा प्रयत्न

## खांदेश्वर पोलिसांकडून संशयित परप्रांतीयाला अटक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देवद गावातील शिवनगर परिसरात पाच वर्षांच्या बालिकेला १० रुपयांचे आमिष दाखवून तिचे अपहरण करण्याचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवारी रात्री उघडकीस आली. सतर्क रहिवाशांनी संशयिताला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. खांदेश्वर पोलिसांनी याप्रकरणी ४१ वर्षीय व्यक्तीला अटक केली असून तो गुजरातमधील सूरत येथील रहिवासी असल्याचे तपासात समोर आले आहे.



देवद गावातील सनातन आश्रमाजवळ शिवनगर वस्ती आहे. या वस्तीत कुटुंबासोबत राहणारी पाच वर्षांची बालिका मंगळवारी रात्री साडेदहाच्या सुमारास घराजवळ खेळत होती. त्यावेळी तेथे आलेल्या ४१ वर्षीय व्यक्तीने तिला १० रुपये देण्याचे आमिष दाखवले आणि तेथून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार जवळच्या रहिवाशांच्या लक्षात येताच त्यांनी संबंधित व्यक्तीला पकडले. त्याच्याकडे वैयक्तिक माहिती विचारली असता त्याने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे रहिवाशांनी त्याला पकडून खांदेश्वर पोलिसांच्या स्वाधीन केले. बालिकेच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२), ६२ अन्वये अपहरणाचा गुन्हा नोंदवला.

खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास करण्यात आला. त्यात संशयित व्यक्ती गुजरातमधील सूरत येथील कतरगाम परिसरातील अग्निशमन केंद्राजवळील कोटेश्वर येथे राहत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी संशयिताच्या नातेवाइकांशी संपर्क साधला. संबंधित व्यक्ती आपल्या मुलीला विमानतळावर सोडण्यासाठी दिल्लीला गेली होती, अशी माहिती नातेवाइकांनी दिली, मात्र तो पनवेलमध्ये कसा पोहचला याबाबत त्यांना कोणतीही माहिती देता आली नाही. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून संशयिताची चौकशी करण्याबरोबरच तांत्रिक तपासही केला जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# आपत्ती धोका निवारण दिनानिमित्त पालिकेत जागरूकता कार्यक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

कोणतीही आपत्ती कधीही सांगून येत नाही. त्यामुळे सतर्क आणि सज्ज राहणे महत्त्वाचे असून संकट आलेच तर मी स्वतःचा बचाव करीन व इतरांनाही मदत करेन ही भूमिका प्रत्येकाने जपण्याची गरज असल्याचे मत महापौर सुजाता पाटील यांनी व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय आपत्ती धोका निवारण दिनाचे औचित्य साधून 'आपत्ती सक्षम नवी मुंबईची निर्मिती' या संकल्पनेवर आधारित विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने व अग्निशमन विभागाने पुढाकार घेऊन सोसायट्या, वसाहती, शाळा-महाविद्यालये या ठिकाणी आपत्ती आल्यास घ्यावयाच्या खबरदारीची व उपाययोजनांची प्रात्यक्षिकांसह माहिती द्यावी, असे त्यांनी सूचित केले. यावेळी उपमहापौर दशरथ भगत, आयुक्त कैलास शिंदे, आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या उपायुक्त स्मिता काळे, उपमुख्य अग्निशमन अधिकारी पुरुषोत्तम जाधव, एनडीआरएफचे नियंत्रक अधिकारी गौरव चौहान व अरुण कुमार, नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव, आगाखान एजन्सी हॅबिटॅट संस्थेच्या प्रतिनिधी अमृता पराडकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी बोलताना उपमहापौर दशरथ भगत यांनी आपत्ती आल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी त्यादृष्टीने आधीपासूनच जागरूक राहण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले व एखाद्या आपत्ती प्रसंगात आपल्यामुळे मदतकार्यात अडथळे येणार नाहीत याचीही प्रत्येकाने काळजी घेण्याची गरज असल्याचे सांगितले. महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी नागरी भागात आगीच्या घटना जास्त घडतात असे निदर्शनास येत असून वाशीतल्या एका दुर्घटनेचा प्रसंग कथन केला. अस्ताव्यस्त पार्किंग केलेल्या वाहनांमुळे बचावकार्यासाठी दाखल झालेल्या अग्निशमन वाहनाला जागा नव्हती, यामध्ये काही वेळ गेला. ही घटना सांगत नागरिकांनी याबाबत सतर्क राहण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यासाठी अग्निशमन विभागाने सोसायट्यांमध्ये बैठका घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने नागरिकांनी घ्यावयाच्या खबरदारीबाबत प्रबोधन करावे, असे सूचित केले. सध्या एल-निनोचा वाढता प्रभाव तसेच हवेतील वाढलेला प्रचंड उष्मा अनेक संकटांना निमंत्रण देणारा असून त्यादृष्टीने आपण जागरूक राहायला हवे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, यावेळी आपत्कालीन परिस्थितीत उत्तम कामगिरी करणारे नमुंमपा अग्निशमन दलातील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी प्रेमानंद ठाकूर, अग्निशमन प्रणेता सुधाकर पाटील, नवनाथ गरूड, प्रकाश पाटील, अग्निशामक गणेश दप्तरे, नितीन दगडे, अभिजीत काटकर, रोहित बांदकर, अल्पेश गोतारणे, समाधान महाजन तसेच नमुंमपा कर्मचारी राज बांगर, कृष्णा नाईक, अजित तांडेल, लवेश पाटील, लक्ष्मीकांत पाटील त्याचप्रमाणे नेरूळ एलपी जंक्शनवरील दोन मुलींना विद्युत शॉक लागण्याच्या दुर्घटनेत मदतकार्य करणारे नागरिक प्रवीण महाले यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# सोनखारमधील प्रस्तावित ऑर्केस्ट्रा बारला स्थानिकांचा तीव्र विरोध

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा येथील सोनखार विभागातील सेक्टर १७, पामबीच मार्गालगत असलेल्या दि अफेअर्स या निवासी व व्यावसायिक इमारतीत मे. हौसा रेस्टॉरंट नावाने येऊ घातलेल्या ऑर्केस्ट्रा बारला राज्य शासनाच्या २७ जुलै २०२६ च्या गृह विभागाच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या तरतुदीनुसार नव्याने परवानगी देऊ नये, अशी मागणी उपमहापौर दशरथ भगत, नगरसेवक निशांत भगत यांनी विभागीय आयुक्त, कोकण भवन आणि परवाना देणाऱ्या प्राधिकरणाकडे केली आहे.

मागील महिन्यातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे याच प्रस्तावित ऑर्केस्ट्रा बारच्या परिसरात एका कार्यक्रमासाठी आले असताना स्थानिक नगरसेवक निशांत भगत यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्या समवेत राज्य शासनाच्या २७ जुलै २०२६ च्या गृह विभागाच्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या तरतुदीनुसार नव्याने ऑर्केस्ट्रा बारना परवानगी देऊ नये या जीआरची अंमलबजावणी व्हावी, याबाबत जनभावना अधिक तीव्र विरोधात असल्याचे पत्र देताना मांडले होते. यावर मुख्यमंत्री यांनी जनमत लक्षात घेऊन जर सामाजिक स्वास्थ्य बिघडणार असेल तर




येथे सदर ऑर्केस्ट्रा बारला परवानगी मिळणार नाही, असे आश्वासित केले होते.

सानपाडा सोनखार येथील नागरिकांचे सामाजिक स्वास्थ्य, शिक्षण व धार्मिक संस्था तसेच ज्येष्ठ, महिला, युवा व लहान मुलांच्या जीवनमानावर होणारे संभाव्य दुष्परिणाम लक्षात न घेता सदरच्या ऑर्केस्ट्रा बारसाठी कोकण विभागीय आयुक्तांकडे बार मालकाने अपिलासाठी अर्ज दाखल केला आहे.

# अतिक्रमण उपायुक्तांचे निलंबन रद्द, विद्युत अभियंत्याचे कायम

**नवी मुंबई : बातमीदार**

लाच घेतल्याप्रकरणी निलंबित करण्यात आलेले अतिक्रमण विभागाचे उपायुक्त कैलास गायकवाड यांचे निलंबन रद्द करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या तहकूब महासभेत घेण्यात आला, तर विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे यांचे निलंबन मात्र कायम ठेवण्याचे निर्देश महापौरांनी दिले आहेत. गाडे यांच्या संपूर्ण कार्यपद्धतीची सखोल चौकशी करण्यासाठी तदर्थ समितीकडे हा विषय सोपविण्यात येणार असून चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना अन्य कोणत्याही विभागात कामावर घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश महापौर सुजाता पाटील यांनी दिले.

अतिक्रमण विभागातील एका कंत्राटदाराचे प्रलंबित बिल मंजुरीसाठी लाच घेतल्याच्या आरोपाखाली लाचलुचपत विभागाने गायकवाड यांना मुख्यालयात रंगेहाथ पकडले होते. महासभेतील विषय क्रमांक ११ वर चर्चा करताना सभागृहनेते सागर नाईक यांनी हा विषय मांडला. माजी महापौर जयवंत सुतार यांनी गायकवाड यांचे निलंबन संपुष्टात आणून त्यांना अतिक्रमण विभाग वगळता उपायुक्त म्हणून कार्यरत करण्याची सूचना केली. ही सूचना महापौर सुजाता पाटील यांनी मंजूर झाल्याचे जाहीर केले. निलंबन रद्द झाले तरी त्यांच्यावरील लाच प्रकरणातील आरोप संपुष्टात आलेले नाहीत.



## दुर्गामाता दौड : (माळ चौथी)

**पनवेल** : जिजाऊसाहेबांनी ज्या हिंदवी स्वराज्याच्या ध्येयासाठी आई भवानीचा आशीर्वाद मागितल्याची प्रेरणादायी परंपरा आपण जपतो, त्याच श्रद्धेने आज आपणही आई दुर्गामातेच्या चरणी नतमस्तक होतो. देव, देश आणि धर्माप्रति आपली निष्ठा दृढ करण्यासाठी, समाजात संस्कार, शौर्य, एकता आणि स्वाभिमान जागवण्यासाठी आपण आशीर्वाद मागतो. तेच हिंदवी स्वराज्याचे संस्कार, तीच मातृशक्तीवरील श्रद्धा आणि तेच उदात्त ध्येय पुन्हा मनामनांत जागवण्याचा संकल्प म्हणजेच दुर्गामाता दौड. खांदा कॉलनी आणि नानोशी गाव येथे ही दौड बुधवारी उत्साहात पार पडली.



# भाविकांचे श्रद्धास्थान आई टाकेदेवी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रसायनी परिसरातील जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील दांडफाटा येथील जागृत व नवसाला पावणाऱ्या श्री टाकेदेवी माता देवस्थानात नवरात्रोत्सवानिमित्त भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्रासह परराज्यांतील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या देवस्थानात देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी पाहायला मिळत आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त राजकीय क्षेत्रातील नेते, प्रशासकीय अधिकारी व विविध क्षेत्रांतील मान्यवर श्री टाकेदेवी मातेच्या दर्शनासाठी येत आहेत. अनेक भाविक देवीच्या चरणी नतमस्तक होऊन नवसपूर्ती करतात. त्यामुळे नवरात्रोत्सवात मंदिर परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिकांच्या श्रद्धेनुसार जागृत टाकेदेवी मातेचे मूळ स्थान इर्शालगडावर असल्याचे सांगितले जाते. दांडफाटा येथील पाण्याच्या कुंडाशीही देवीची आख्यायिका जोडलेली आहे. पूर्वी कुंडाजवळ देवीचे वास्तव्य असल्याची भाविकांची श्रद्धा आहे.

स्थानिकांकडून सांगितल्या जाणाऱ्या आख्यायिकेनुसार देवीच्या दर्शनासाठी व नवसपूर्तीसाठी येणाऱ्या भाविकांना जेवण बनवण्यासाठी लागणारी भांडी कुंडातून पाण्यावर तरंगत बाहेर येत असत. या आख्यायिकेमुळे टाकेदेवी मातेच्या देवस्थानाबद्दल भाविकांच्या मनात विशेष श्रद्धा व भक्तिभाव आहे. या कथा स्थानिक लोकपरंपरेचा व श्रद्धेचा भाग म्हणून आजही सांगितल्या जातात. श्री टाकेदेवी मातेच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून तसेच राजस्थान, हरियाणा, दिल्ली आणि गुजरात या राज्यांतूनही भाविक येत असल्याचे सांगितले जाते. कुटुंबात सुख-समृद्धी नांदावी, मनोकामना पूर्ण व्हाव्यात आणि जीवनात आनंद लाभावा या श्रद्धेने भाविक देवीचे दर्शन घेतात. नवरात्रोत्सवातील पूजाअर्चा, आरती आणि धार्मिक विधींमुळे देवस्थान परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे.

## नवरंग | रंग निळा



फुंडे हायस्कूल शिक्षिका वृंद, उरण



पनवेल महापालिका कर्मचारी वृंद



सुषमा पाटील विद्यालय अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज, कामोठे



एपेक्स हॉस्पिटल, बोरिवली



गव्हाण-कोपर हायस्कूल, विद्यार्थी आणि शिक्षिका वृंद



भक्तीसागर सोसायटी, धाटाव

# धाटाव बँक ऑफ इंडियाचा अजब कारभार

## दहावीच्या विद्यार्थ्यांना चुकीची माहिती देऊन परत पाठवले

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव येथील बँक ऑफ इंडिया शाखेतील कर्मचाऱ्यांच्या कथित चुकीच्या माहितीमुळे दहावीच्या विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागल्याची घटना समोर आली आहे. शाळेतील इयत्ता दहावीचे विद्यार्थी बँकेत खाते उघडण्यासाठी गेले असता, पॅनकार्ड नसल्याचे कारण देत खाते उघडता येणार नसल्याचे त्यांना सांगण्यात आल्याचा आरोप पालकांनी केला आहे. त्यामुळे नाराज झालेले विद्यार्थी बँकेतून माघारी परतले.



या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पालकांनी थेट बँकेत धाव घेत अधिकाऱ्यांना जाब विचारला. त्यानंतर बँक प्रशासनाने कर्मचाऱ्यांकडून चुकीची माहिती दिली गेल्याचे मान्य करत दिलगिरी व्यक्त केली.

दहावीचे शैक्षणिक वर्ष विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. अशा परिस्थितीत शासकीय सुविधांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना बँकेत खाते उघडायचे असल्यास त्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे अपेक्षित आहे, मात्र धाटाव हायस्कूलमधील दहावीच्या विद्यार्थ्यांना बँकेत खाते उघडण्यासंदर्भात पॅनकार्ड नसल्याचे कारण सांगून परत पाठवण्यात आले.

विद्यार्थ्यांनी बँकेत खाते उघडण्याबाबत विचारणा केली असता, पॅनकार्ड नसल्यामुळे खाते उघडता येणार नाही, अशी माहिती कर्मचाऱ्यांनी दिल्याचे पालकांचे म्हणणे आहे. त्यामुळे खाते उघडण्याची अपेक्षा घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांना निराश होऊन घरी परतावे लागले. बँकेतून योग्य माहिती न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया गेला, तसेच पालकांनाही या प्रकरणात हस्तक्षेप करावा लागला.

या प्रकारानंतर पालकांनी बँकेत जाऊन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यावेळी बँकेचे शाखा व्यवस्थापक रामू यांनी कर्मचाऱ्यांकडून चुकीची माहिती दिली गेल्याचे स्पष्ट करत दिलगिरी व्यक्त केली. कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या माहितीमुळे बँकेचा व्यवसायही दुसरीकडे जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केल्याचे पालकांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना पालकांच्या नावासह संयुक्त खाते (जॉइंट अकाउंट) उघडण्याबाबत योग्य मार्गदर्शन करता आले असते, असेही या चर्चेदरम्यान स्पष्ट करण्यात आले.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांची बँक खाती महत्त्वाची असतात. अशा वेळी बँकेतूनच योग्य मार्गदर्शन मिळत नसेल, तर सर्वसामान्य नागरिकांनी नेमके कोणाकडे दाद मागायची, असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, या प्रकरणावर बोलताना बँकेचे शाखा व्यवस्थापक रामू यांनी झालेल्या त्रासाबद्दल दिलगिरी व्यक्त केली. यापुढे अशा प्रकारची चुकीची माहिती ग्राहकांना दिली जाणार नाही, याची काळजी घेतली जाईल तसेच कर्मचाऱ्यांकडून पुन्हा अशा प्रकारची चूक झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, अशा पद्धतीने विद्यार्थ्यांना वेठीस धरणे चुकीची बाब आहे. अकाउंटसाठी मुलांना पुन्हा फेऱ्या मारायला लावल्यास अधिकाऱ्यांना धडा शिकवू, असा इशारा भाजप धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे यांनी दिला आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात खालापूर पंचायत समितीला पुरस्कार प्रदान



## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

**खोपोली : प्रतिनिधी**

ग्रामविकास विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५–२६ अंतर्गत रायगड जिल्ह्यातील खालापूर पंचायत समितीने राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त केला आहे. नाशिक येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, शिक्षणमंत्री दादा भुसे, अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव एकनाथ डवले, ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे प्रधान सचिव चंद्रकांत पुलकुंडवार यांच्यासह खासदार, आमदार, पादाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५–२६मध्ये रायगड जिल्ह्यातील एकूण १६३ ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये खालापूर तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतींचा समावेश होता. या सर्व ग्रामपंचायतींनी अभियानातील विविध घटकांवर नियोजनबद्ध पद्धतीने काम करत उत्कृष्ट कामगिरी केली. हा पुरस्कार रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, गटविकास अधिकारी संदीप कराड तसेच चौक व वडवळ ग्रामपंचायतींचे सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी यांनी स्वीकारला.

खालापूर पंचायत समितीच्या राज्यस्तरीय यशासोबतच रायगड जिल्ह्यातील तळा, श्रीवर्धन आणि अलिबाग पंचायत समित्यांनीही अभियानात उल्लेखनीय कामगिरी बजावली. ग्रामपंचायत स्तरावरील विकासकामे, अभियानाच्या निकषांनुसार अंमलबजावणी, लोकसहभाग आणि विविध उपक्रमांमधील सातत्य या बाबींनी तालुक्याच्या यशात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# खोपोलीत प्रतिबंधित पानमसाला जप्त; दोघांवर गुन्हा

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली शहरात प्रतिबंधित सुगंधित पानमसाला आणि गुटखा विक्रीविरोधात १३ ऑक्टोबर रोजी पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ४९ हजार,४२७ रुपये किमतीचा रजनीगंधा आणि विमल पानमसाला जप्त करण्यात आला.

या प्रकरणी वहिदा शेख (३९, खोपोली बाजारपेठ) आणि हजरल खुश महम्मद (३९, भाऊ कुंभार चाळ, खोपोली) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस हवालदार रणजितसिंह खराडे यांना गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.



पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार संदीप पाटील, हवालदार शरद फरांदे, रणजितसिंह खराडे व मनोहर शिरतार यांच्या पथकाने कारवाई केली. आरोपींविरोधात विविध कलमे व अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल झाला आहे.

## चौकमध्ये विद्यार्थ्यांसाठी दंत तपासणी शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

स्वामीज्ञ फाउंडेशन आणि परफेक्ट स्माईल डेंटल क्लिनिक आणि इम्प्लांट सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा (दगडी शाळा) चौक येथे विद्यार्थ्यांसाठी दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. स्नेहा अशोक पटेल आणि डॉ. सुरभी जैन यांनी विद्यार्थ्यांची दंतचिकित्सा आणि मार्गदर्शन केले.

शिबिरास चौक ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच पूजा जगदीश हातमोडे यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. यावेळी १०९ विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली तसेच पेस्ट अणि ब्रश देण्यात आला. अंजली घोडके, पूजा हातमोडे, सरिता चौधरी, नाना साखरे, वीरभद्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हे शिबिर त्यांच्या सहकार्याने घेण्यात आले. शिक्षिका नाईक यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# तळा क्रीडा संकुल खेळाडूंसाठी आधार; इनडोअर गेम्सना पसंती

**तळा : प्रतिनिधी**

दुर्गम, डोंगराळ तळा तालुक्यासाठी बोरघरहवेली येथे असलेले क्रीडा संकुल खेळाडूंसाठी आधार ठरत आहे. या क्रीडा संकुलात बॅडमिंटन कोर्टवर सकाळ–संध्याकाळ मोठ्या प्रमाणावर खेळाडू खेळत असल्याचे पहावयास मिळते.



तत्कालीन पालकमंत्री आणि विद्यमान खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते तळा तालुका क्रीडा संकुलाचे लोकार्पण १९ ऑगस्ट २०१२ रोजी झाले होते. ग्रामीण भागातील खेळाडूंना विविध खेळांसाठीचा सराव व मार्गदर्शन व्हावे, जेणेकरून येथील खेळाडूंना संधी मिळून ते राज्य, राष्ट्रीय, जागतिक पातळीवर तसेच ऑलिम्पिक स्पर्धेपर्यंत जाण्याच्या दृष्टीने असे हे क्रीडा संकुल तालुका पातळीवर झाले आहे. या ठिकाणी भालाफेक, थाळीफेक, कबड्डी, बॅडमिंटन, लॉंग टेनिस, बास्केटबॉल, धावणे इत्यादींसाठी क्रीडांगणे व साहित्य उपलब्ध आहे.

या क्रीडा संकुलात विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार पावसाळी क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात होत असतात. येथील क्रीडा संकुलाचा खेळाडूंना उपयोग व्हावा या दृष्टीने एखाद्या क्रीडा मंडळाने पुढाकार घेऊन मार्गदर्शन व खेळांचा सराव तसेच विविध स्पर्धांचे आयोजन केल्यास होतकरू व नवीन खेळाडूंना प्रोत्साहन मिळून चांगल्या दर्जाचे खेळाडू येथे निर्माण होतील अशी अपेक्षा क्रीडाप्रेमींकडून होत आहे. येथील जिममध्येही तरुणवर्ग व्यायाम करत असताना पहावयास मिळत आहे.

या क्रीडासंकुलाचा वापर ग्रामीण व स्थानिक खेळाडू करत असल्याने ते विविध खेळांमध्ये निवड होण्यास पात्र ठरून जिल्हा, राज्य व देशपातळीवरही जाण्यास प्रोत्साहन मिळत आहे. प्रवेशद्वारासमोरील वाढलेले गवत काढण्याचे काम लवकर चालू झाल्याने क्रीडाप्रेमींतून समाधान व्यक्त होत आहे.

# सेवा सप्ताहातील उपक्रमांमध्ये नागोठणे लायन्स क्लब तृतीय

**नागोठणे : बातमीदार**

सेवाभावी कार्याची उज्ज्वल परंपरा कायम राखणाऱ्या नागोठणे लायन्स क्लबने डिस्ट्रिक्टमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. या यशात एमजेएफ यशवंत चित्रे यांचे विशेष योगदान राहिले.

नागोठणे लायन्स क्लबने अध्यक्ष लायन विलास चौलकर यांच्या नेतृत्वाखाली सेवा सप्ताहात विविध सामाजिक उपक्रम राबविले. यासाठी ॲक्टिव्हिटी चेअरपर्सन विवेक सुभेकर यांनी नियोजन केले. वाशी येथे झालेल्या फिलाईट डे कार्यक्रमात नागोठणे क्लबला मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमास डिस्ट्रिक्ट गव्हर्नर प्रवीण सरनाईक, पास्ट इंटर नॅशनल डायरेक्ट विजयकुमार राजू, खास निमंत्रित पीआयडी पंकजकुमार मेहता, फर्स्ट व्हीडीजी विजय गणात्रा सेकंड व्हीडीजी डॉ. नमिता मिश्रा, आयपीडीजी संजीव सूर्यवंशी, ॲडव्हायझर पीएमसीसी अड. सुभाष भालवाल, जीएसटी चेअरमन अनिल म्हात्रे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे नागोठणे क्लबचे सेक्रेटरी डॉ. अनिल गिते, सहसेक्रेटरी विजय शहासने, सहखजिनदार विद्या म्हात्रे, अनुराधा शहासने, संतोष शहासने, सखाराम ताडकर, ॲड. महेंद्र धामणे हेही हजर होते.



## एमडीएस परीक्षेत मिस्बाह शेखचे यश

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सिराज शेख यांची कन्या मिस्बाह शेख हिने दंतशास्त्र क्षेत्रात दिल्ली विद्यापीठामधून एमडीएस पदवी प्राप्त केली आहे. या यशाबद्दल बोर्ली येथील जमातुल मुसलिमिनतर्फे मिस्बाहचे वडील सिराज शेख यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ, सरपंच सपना जायपाटील, जमातुल मुस्लिमन अध्यक्ष इकबाल दळवी, सचिव अंजुम सुभेदार, खजिनदार यासीन दळवी, जामा मस्जिद इमाम मौलाना मुदससिर, अश्विनी ठाकूर, वकास अनवारे, इम्तियाज दळवी, मुख्याध्यापक प्रवीण चौगले, प्रकाश शिंदे आदी उपस्थित होते. सर्वांनी मिस्बाहच्या यशाचे कौतुक केले.

# खालापूरची ग्रामदेवता साबाई माता

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरेनुसार खालापूरची ग्रामदेवता साबाई माता मंदिरात यावर्षीही नवरात्र उत्सव व साबाई मातेचा पालखी सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येत आहे.

साबाई मातेचे मूळस्थान मुंबई–पुणे हायेवलगत ढापनि गडावर आहे. दरवर्षी हनुमान जयंतीला ढापनि गडावर खालापूर ग्रामस्थ जात असतात, तर नवरात्री उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन मंदिरात केले जाते. यामध्ये दररोज रात्री भजन होते. त्याचबरोबर सप्तमीला रात्री बारा वाजता महाआरती केली जाते. अष्टमीला मंदिरात नवचंडी होम केला जातो.

पूर्वापार चालत आलेल्या परंपरेनुसार दसऱ्याच्या दिवशी मामलेदार (तहसीलदार) यांच्या हस्ते मंदिरात आपट्याची पाने रचून त्याची पूजा केली जाते. मामलेदारांनी आपट्याच्या पानांची पूजा केल्यानंतर सोने लुटालुटीचा कार्यक्रम होतो. हे सोने लुटल्यांतर प्रथम ते देवीला अर्पण करून नंतर एकमेकांना दिले जाते. दसऱ्याच्या दिवशी संपूर्ण गावात रात्री पालखीचे जागोजागी ग्रामस्थ स्वागत करतात व भक्तिभावाने दर्शन घेतात. नववधू व माहेरपणाला आलेली लेक देवीची ओटी भरूनच गावाची वेस ओलांडते. नवरात्रीमध्ये खालापूर गाव व पंचक्रोशीतील भक्त तसेच परराज्यातूनही मोठ्या प्रमाणात भाविक देवीची



ओटी भरण्यासाठी आई साबाई मंदिरात येत असतात.

देवीचा नवरात्री उत्सव साजरा करण्यासाठी ग्रामस्थ मेहनत घेतात. देवीची रोजची पूजा–अर्चा पुजारी राजू देसाई व त्यांच्या मातोश्री गं.भा. सरिता देसाई करत असतात, तर त्यांना दीपक जगताप सहकार्य करतात.

# आमदार महेंद्र दळवींकडून पाटेकर कुटुंबीयांचे सांत्वन

**मुरुड : प्रतिनिधी**

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाने कलाविश्वासह सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचा एक आधार हरपला आहे. या पार्श्वभूमीवर अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी पुण्यातील डोणजे येथे जाऊन पाटेकर कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी आमदार दळवी यांच्या सोबत शिवसेनेचे माजी मुरुड शहराध्यक्ष व व्यापारी पतसंस्थेचे चेअरमन संदीप पाटील, उपाध्यक्ष ललित जैन, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष व नगरसेवक नितीन आंबुर्ले, मुरुड पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ आदी उपस्थित होते. यावेळी आमदार महेंद्र दळवी यांनी नानांना आदरांजली वाहून कुटुंबीयांचे सांत्वन केले तसेच नाम फाऊंडेशनचे कार्य पुन्हा जोमाने सुरू राहण्यासाठी सहकार्य करू, असा शब्द यावेळी दिला.



# वावंढळमध्ये जानाई-इंजाई देवींचा जागर

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वावंढळ या कोयना प्रकल्पग्रस्त गावच्या नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली असून गावासह पंचक्रोशीतील भाविक जानाई व इंजाई देवीच्या दर्शनासाठी गर्दी करू लागले आहेत.

सातारा जिल्ह्यातील जावळी खोऱ्यातून कोयना जल विद्युत प्रकल्पामुळे विस्थापित झालेले जांब्रुक येथील कोयना प्रकल्पग्रस्त आजही आपली संस्कृती, परंपरा,रितीरिवाज आणि धार्मिक सण कार्यक्रम साजरे करतात. ६७ वर्ष विस्थापित होऊन झाली, तरी आजही होळी, गणपती आणि नवरात्री यांची परंपरा रितीरिवाज कायम आहेत.

वावंढळ या ठिकाणी सर्व तरुण मंडळी वयस्कर लोकांच्या मार्गदर्शनाखाली देवीचे धार्मिक विधी करतात. जानाई व इंजाई दोन्ही पाषाण रुपात असून




सध्या मंदिराचा जीर्णोद्धार सुरू आहे. लवकरच भव्य मंदिर उभे राहील. येथे आजही सातारा जिल्ह्यातून गोंधळी येतात. त्यांनीही त्यांची परंपरा राखली आहे.

येथील प्रत्येक घरातून मूठभर कडधान्य आणले जाते, ते दुधात मिसळून त्यावर घटाची स्थापना केली जाते. दसऱ्याच्या दिवशी तयार झालेला कुंभ आपल्या घरी आणला जातो. या दिवशी दोरे (लक्ष्मीच्या गाठी) सोडले जातात. नऊ दिवसात अगदी परदेशी असलेला माणूसदेखील दर्शनाला येतो. नवसाला पावणारी देवी म्हणून पंचक्रोशीतील भाविक देवीची ओटी भरून जातात.

# आयसीसी क्रमवारीत श्रेयसची मुसंडी



**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या ताज्या कसोटी आणि टी-२० क्रमवारीत मोठे फेरबदल पाहायला मिळाले आहेत. डर्बन येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या शानदार विजयानंतर ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू रेनशॉ आणि जोश हेझलवूड यांनी क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे. दुसरीकडे भारताचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यरने टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजी क्रमवारीत कारकिर्दीतील सर्वोत्तम अशा चौथ्या स्थानावर मजल मारली असून यामुळे आयसीसीच्या अव्वल चार खेळाडूंमध्ये आता भारताचे तीन शिलेदार समाविष्ट झाले आहेत.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू रेनशॉने पहिल्या डावात १९० आणि दुसऱ्या डावात ८२ धावांची धमाकेदार खेळी केली.

या अप्रतिम कामगिरीच्या जोरावर त्याची कसोटी फलंदाजी क्रमवारीत १००च्या बाहेरून थेट संयुक्त ४९ व्या स्थानी धडक झाली आहे. डर्बन कसोटीत शेवटच्या दिवशी सहा बळी आणि ४९ धावा (६/४९) अशी कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी नोंदवणारा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड दोन स्थानांच्या सुधारणेसह सातव्या स्थानी पोहचला आहे. त्याचा साथीदार मिचेल स्टार्क कसोटी गोलंदाजांच्या यादीत आपले अव्वल स्थान राखून आहे. याशिवाय भारताचा अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजा कसोटी अष्टपैलूंच्या यादीत अद्यापही नंबर वन विराजमान आहे.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत भारताचा दबदबा आणखी वाढला आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या घरगुती मालिकेतील पहिल्याच सामन्यात शानदार शतक झळकावणाऱ्या श्रेयस अय्यरने क्रमवारीत तीन स्थानांची घसघशीत प्रगती करत थेट चौथे स्थान पटकावले आहे. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे आता टी-२० फलंदाजीच्या शीर्ष चार स्थानांपैकी तीन स्थानांवर भारतीय खेळाडूंचेच वर्चस्व आहे. यामध्ये ईशान किशन पहिल्या, तर आक्रमक फलंदाज अभिषेक शर्मा दुसऱ्या क्रमांकावर कायम आहेत. पाकिस्तानचा कर्णधार साहिबजादा फरहान तिसऱ्या स्थानावर आहे.

# जिल्हास्तरीय बॅडमिंटन आणि फुटबॉल स्पर्धेत 'सीकेटी'चे यश







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयोजित शालेय बॅडमिंटन आणि फुटबॉल स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

पनवेल येथील कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी या ठिकाणी झालेल्या १९ वर्षाखालील बॅडमिंटन स्पर्धेत सीकेटी विद्यालयातील मुलींच्या संघाने द्वितीय, तर मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

खारघरमधील बी.डी.सोमाणी इंटरनॅशनल स्कूल येथे झालेल्या फुटबॉल स्पर्धेत सीकेटी विद्यालयातील १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कबड्डी स्पर्धेत भिलजी-बोरघर हायस्कूलच्या मुलींचा संघ विजेता

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत को.ए.सो.च्या श्रीमती बामीबाई नाना पुनकर हायस्कूल, भिलजी-बोरघर येथील विद्यार्थिनींनी दमदार कामगिरी करत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक पटकावला.

स्पर्धेत भिलजी-बोरघर हायस्कूलच्या मुलींनी जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास आणि सांघिक भावनेच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांना मात देत प्रथम क्रमांकावर आपले नाव कोरले. या कबड्डी संघात अनुष्का कनोजे, मानसी वाघमारे, नव्या झावरे, आर्या पाटील, सई सुभेकर, सफा चौगुले, स्नेहा झावरे, अलीना फक्की आणि वेदा अष्टवकर आदी विद्यार्थिनींचा समावेश होता. त्यांना प्रशिक्षक किशोर राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांचे अभिनंदन होत आहे. भविष्यात या विद्यार्थिनींनी जिल्हा व राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे नाव उज्वल करावे, अशा शुभेच्छा देण्यात आल्या.



# अॅथलेटिक्स स्पर्धेत पिल्लई एचओसीएल स्कूलची चमक



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गोवा येथील बाम्बोलीमच्या अटल अॅथलेटिक्स स्टेडियमवर पार पडलेल्या ३७व्या पश्चिम विभागीय ज्युनिअर अॅथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६मध्ये रसायनी येथील पिल्लई एचओसीएल स्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत आरुष चव्हाण याने दोन सुवर्णपदकांची कमाई केली, तर रूपेश कामती याने कांस्यपदक पटकावले.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटात आरुष चव्हाणने पेंटाथलॉन प्रकारात ३,६५३ गुणांसह सुवर्णपदक पटकावले. याशिवाय मेडले रिलेमध्येही सुवर्णपदक मिळवले. १६ वर्षांखालील मुलांच्या गटातील उंच उडी या क्रीडा प्रकारात रुपेश कामती याने कांस्यपदक मिळवले. त्यांना अॅथलेटिक्स प्रशिक्षक तथा क्रीडा शिक्षक अन्नू यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल प्राचार्य डॉ. रीमा निकळजे, मॅनेजमेंट रिप्रेझेंटेटिव्ह आर.बी. पाटील, स्पोर्ट्स डायरेक्टर पद्माक्षण यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# बास्केटबॉल निवड चाचणी

**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्हा बास्केटबॉल संघटनेतर्फे खुल्या गटातील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संघ निवड चाचणी येत्या रविवारी (दि.१८) सकाळी ६.३० वाजता महात्मा शाळेचे मैदान, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आली आहे.

खेळाडू रायगड जिल्ह्याचा रहिवासी असावा किंवा त्याची शाळा अथवा महाविद्यालय रायगड जिल्ह्यात असणे आवश्यक आहे. पात्र खेळाडूंनी वेळेत उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी आकाश चाकणे (९०२९५९६९४९), आशिष पाटणे (९०२९५९६८८०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

# आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय पुरुष हॉकी संघाची घोषणा

**नवी दिल्ली** : हॉकी इंडियाने 'आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी पंजाब २०२' साठी भारतीय पुरुष हॉकी संघाची अधिकृत घोषणा केली आहे. आगामी २७ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरदरम्यान पंजाबमधील जालंधर आणि मोहाली येथे ही स्पर्धा रंगणार आहे.

जपानमधील आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवून देत विजेतेपद यशस्वीपणे राखणाऱ्या मुख्य संघावरच निवड समितीने पुन्हा एकदा विश्वास दाखवला असून संघाचे नेतृत्व स्टार ड्रॅग फ्लिकर हरमनप्रीत सिंग याच्याकडेच सोपवण्यात आले आहे. मायदेशात आशियातील आघाडीच्या हॉकी संघांशी सामना करण्यासाठी संघात मोठे बदल न करता सातत्य राखण्यावर भर देण्यात आला आहे.





## झंकार नवरात्रोत्सव















पनवेल : सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने मिडलक्लास हौसिंग सोसायटीमध्ये आयोजित झंकार नवरात्रोत्सवाच्या तिसऱ्या दिवशीही परिसरातील दांडिया रसिकांनी फेर धरत गरब्याचा मनमुराद आनंद लुटला. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक सुमित झुंजारराव तसेच प्रशांत शेटे, संजय जैन, प्रभाग १९ अध्यक्ष पवन सोनी, अमोघ ठाकूर आदी उपस्थित होते. विजयी झालेल्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com